
कै. राजकवि भास्करराव तांबे

यांची कुंडली




कार्तिक शुद्ध ६, सोमवार, शके १७९५, सं. १९३० सूर्योदयादिष्ट घटि ३-४४

जन्मस्थान **मुगावली** : लग्न ६-२९

ह्या पुस्तकांतील कविता, भाषान्तर वा रूपान्तर करणें-करविणें, आकाशवाणी, ध्वनिमुद्रण, चलच्चित्र, विश्वविद्यालयीन, तसेंच शालेय क्रमिक व इतर वेंचांचा संग्रह इत्यादींकरिता उपयोग करण्याचे सर्व हक्क ग्रंथमालक श्री. म. भा. तांबे, ग्वाल्हेर, यांचेकडे आहेत. सदर हक्कांची पायमल्ली कोणीं केल्यास त्यावर कायदेशीर इलाज केला जाईल.

—प्रकाशक

# मधुघटामधील मधु

आधुनिक कवींत तांब्यांइतका भाग्यवान कवि दुसरा कोणीहि झाला नाही. लहानपणीं सहजगत्या रचिलेल्या काव्यपंक्तींवरून त्यांच्या अंगीं असलेला कविप्रतिभेचा स्फुलिंग ओळखून, तो फुलवून, त्याचें संवर्धन करणारा गुरु त्यांना लाभला. गुरूने शिष्याच्या कवित्वासंबंधाने दाखविलेली आस्था स्वतः शिष्याने मात्र स्वतःच्या काव्यरचनेबाबत बाळगिली नाही. तांब्यांनी स्वतःच सांगितल्याप्रमाणे कविता लिहून झाल्यावर तिचें काय होतें याविषयी ते बेफिकीर असत. त्या कवितांचें मोठ्या साक्षेपाने संकलन करून त्या प्रकाशित करणारा एक भक्त, व तोहि स्वतः कवि असणारा, त्यांना मिळाला. कवि म्हणून तांब्यांच्या भाग्याला येथून सुरुवात झाली, आणि अखेरपर्यंत तें वृद्धिंगतच होत गेलें. त्यांच्या कवितेचा पहिला भाग प्रसिद्ध झाला, आणि तांबे महाराष्ट्रांत प्रसिद्ध व लोकप्रिय झाले. या यशाने त्यांच्या काव्यरचनेस अधिकच तेज चढलें व कवियशहि वाढत गेलें. यानंतरच्या काव्यरचनेस संपादक म्हणून त्यांना दुसरा एक कवि लाभला, व तांब्यांचा काव्यौघ अप्रतिहत चालू राहिला. कविप्रतिभेचा पुरापुरा उन्मेष होण्याच्या आधीच दत्तकवि गेले, उन्मेष होऊनहि तिला स्थिर पक्वता येण्याच्या आधीच गोविंदाग्रज व बालकवि दिवंगत झाले; अशी पक्वता येऊनहि तिचीं फळें पूर्णपणें हातीं लागण्यापूर्वीच केशवसुत आणि माधव ज्यूलियन् यांस काळाने ओढून नेलें. कांही कालपर्यंत काळ तांब्यांच्या समोर येऊन उभा टाकला होता, पण तो परत गेला व तांब्यांच्या प्रतिभेच्या विलासाला त्याने पूर्णपणें वाव दिला. कवीची षष्ठ्यब्दि साजरी होण्याचे प्रसंग महाराष्ट्रांत तरी विरलच होत, पण तांब्यांच्या बाबतींत ती साजरी झाली व आपला गौरव त्यांना आपल्या डोळ्यांनी पाहावयास मिळाला. त्यानंतर त्यांचा समग्र काव्यसंग्रह परिश्रमपूर्वक संपादण्यास तिसरा एक कवि पुढे सरसावला. ही गोष्ट त्यांच्या आजवरच्या भाग्याचा कळस समजावयास हवी. एकदा मध्यभारतीय कविसंमेलनाचे व पुढे कोल्हापूर येथील संमेलनाच्या

८१९२-४ काव्य
२१-८-५८ १ मा. ५८३

# मधुघटामधील मधु

आधुनिक कवींत तांब्यांइतका भाग्यवान कवि दुसरा कोणीहि झाला नाही. लहानपणीं सहजगत्या रचिलेल्या काव्यपंक्तींवरून त्यांच्या अंगीं असलेला कविप्रतिभेचा स्फुलिंग ओळखून, तो फुलवून, त्याचें संवर्धन करणारा गुरु त्यांना लाभला. गुरूने शिष्याच्या कवित्वासंबंधाने दाखविलेली आस्था स्वतः शिष्याने मात्र स्वतःच्या काव्यरचनेबाबत बाळगिली नाही. तांब्यांनी स्वतःच सांगितल्याप्रमाणे कविता लिहून झाल्यावर तिचें काय होतें याविषयी ते बेफिकीर असत. त्या कवितांचें मोठ्या साक्षेपाने संकलन करून त्या प्रकाशित करणारा एक भक्त, व तोहि स्वतः कवि असणारा, त्यांना मिळाला. कवि म्हणून तांब्यांच्या भाग्याला येथून सुरुवात झाली, आणि अखेरपर्यंत तें वृद्धिंगतच होत गेलें. त्यांच्या कवितेचा पहिला भाग प्रसिद्ध झाला, आणि तांबे महाराष्ट्रांत प्रसिद्ध व लोकप्रिय झाले. या यशाने त्यांच्या काव्यरचनेस अधिकच तेज चढलें व कवियशहि वाढत गेलें. यानंतरच्या काव्यरचनेस संपादक म्हणून त्यांना दुसरा एक कवि लाभला, व तांब्यांचा काव्यौघ अप्रतिहत चालू राहिला. कविप्रतिभेचा पुरापुरा उन्मेष होण्याच्या आधीच दत्तकवि गेले, उन्मेष होऊनहि तिला स्थिर पक्वता येण्याच्या आधीच गोविंदाग्रज व बालकवि दिवंगत झाले; अशी पक्वता येऊनहि तिचीं फळें पूर्णपणें हातीं लागण्यापूर्वींच केशवसुत आणि माधव ज्यूलियन् यांस काळाने ओढून नेलें. कांही कालपर्यंत काळ तांब्यांच्या समोर येऊन उभा ठाकला होता, पण तो परत गेला व तांब्यांच्या प्रतिभेच्या विलासाला त्याने पूर्णपणें वाव दिला. कवीची षष्ठ्यब्दि साजरी होण्याचे प्रसंग महाराष्ट्रांत तरी विरलच होत, पण तांब्यांच्या बाबतींत ती साजरी झाली व आपला गौरव त्यांना आपल्या डोळ्यांनी पाहावयास मिळाला. त्यानंतर त्यांचा समग्र काव्यसंग्रह परिश्रमपूर्वक संपादण्यास तिसरा एक कवि पुढे सरसावला. ही गोष्ट त्यांच्या आजवरच्या भाग्याचा कळस समजावयास हवी. एकदा मध्यभारतीय कविसंमेलनाचें व पुढे कोल्हापूर येथील संमेलनाच्या

मराठी ... ९३४८० ... क्र. क्र.

काव्यविभागाचें अध्यक्षपद मिळून तांब्यांच्या कवियशावर शिक्का-मोर्तब झालें ही गोष्टहि अनेक कवींना अनुभवावयास न मिळणारी आहे. इतर अनेक कवींच्याबाबत अनुकूल–प्रतिकूल असे स्पष्ट पक्ष पडतात, पण तांब्यांच्याबद्दल मात्र एकवाक्यता आढळते. समकालीन अनेक कवींच्या-प्रमाणे जीवनांत व विशेषत: प्रेमाच्या बाबतींत निराशा पदरीं न येतां समाधानाचाच अनुभव तांब्यांना आला ही गोष्ट अल्प भाग्याची म्हणतां येईल काय ? या साऱ्या भाग्यापुढे जीवनाच्या अखेरीस लोकमान्यतेबरोबर राजमान्यताहि आणि तीबरोबर राजकविपद मिळालें हें यश खरोखर ठेंगणेंच वाटावें. तेव्हा जीवनाध्वरांत पूर्णाहुति देण्याची वेळ येतांच आपण ' कृती ' असल्याची भावना तांब्यांना व्हावी यांत नवल नाही ! आधुनिक कवींत तांब्यांइतका भाग्यवान कवि दुसरा कोणी झाला नाही याला अधिक पुरावा तो कोणता पाहिजे ?

तांब्यांच्या यशांत केवळ भाग्याचा भाग होता असें समजणें मात्र चुकीचें होईल. त्यांची काव्यनिष्ठा आणि त्यांच्या काव्यांतील गुणसंपदा यांचा भरीव आधार त्याला होता म्हणून तें यश त्यांना मिळूं शकलें. तांब्यांच्या दैवाने त्यांच्याकरिता नियोजिलेला उपजीविकेचा व्यवसाय व त्यांच्या भोवतालचें वातावरण हीं काव्यनिर्मितीस विशेष पोषक होतीं असें म्हणतां येणार नाही. प्रारंभींचा शिक्षकाचा व्यवसाय वाङ्मयाच्या अभ्यासास अनुकूल असला तरी पुढील जीवनांत त्यांना ज्या भूमिका स्वीकाराव्या लागल्या त्या मात्र काव्यरचनेस प्रतिकूलच म्हणाव्या लागतील. संस्थानी वकील, दिवाण, न्यायाधीश, सुपरिंटेंडंट व रजिस्ट्रार ऑफ एक्झॅमिनेशन्स् हीं पदें कामाच्या गर्दीमुळेच नव्हे तर, स्वरूपामुळेहि काव्यवृत्तीस विरोधीच होतीं असें दिसतें; व राजपुरुष व राजकारण या गोष्टी तर नुसत्या विरोधीच नव्हे तर तिला घातकहि ठरण्याचा संभवच अधिक. मूळची काव्यनिष्ठा यामुळे लुप्त झाल्याचें उदाहरण तांब्यांच्या समकालीनांतच व मध्यभारतांतहि आढळण्यासारखें आहे. तांब्यांचें वैशिष्ट्य हें की, आपल्या निर्मित कवितेच्या भवितव्याबद्दल जरी ते बेफिकीर असले, तरी तिची निर्मिति त्यांनी सोडून दिली असें झालें नाही. ' काव्याकरिता काव्यरचना ' किंवा ' स्वतःच्या समाधानार्थ काव्यलेखन ' या गोष्टींवर कोणाचा विश्वास असो वा नसो,

तांब्यांच्या बाबत या गोष्टी खऱ्या होत्या असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. कवि या नात्याने लक्षांत घेण्यासारखें यश त्यांना त्यांचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर म्हणजे १९०० नंतरच लाभलें. तोंपर्यंत पन्नाशी दिसूं लागली होती व त्यांच्या कवितेचा रसिकवर्ग हा मर्यादितच होता. पण त्यांच्या कवितेचा नवा नवा उन्मेष यापुढे बराच कालपर्यंत होत राहिला. 'मधुघट रिकामे पडले आहेत' असें स्वत: तांबे यांनी म्हटल्यानंतरहि काव्य-मधूचे ४०-४५ द्रोण त्यांनी रसिकांच्या हातांत दिले, यावरून तांब्यांच्या काव्यप्रतिभेचा झरा जिवंत होता व अखेरपर्यंत तो तसा राहिला हीच गोष्ट स्पष्ट होते. तांबे हे प्रकृत्या कवि होते व कवि राहिले यांत शंका नाही.

तांबे आणि केशवसुत यांचे संप्रदाय एक आहेत की भिन्न आहेत अशा स्वरूपाचा वाद मुंबई येथे १९५० सालीं झालेल्या साहित्यसंमेलनामध्ये उपस्थित करण्यांत आला होता. या दोनहि संप्रदायांमध्ये कित्येक बाबतींत साधर्म्य आहे. पहिली महत्त्वाची बाब म्हणजे भावगीत-रचना ही आहे. तांबे यांची बहुतेक सारी रचना, त्यांचीं नाट्यगीतें धरूनहि, भावगीत-स्वरूपाची आहे. दीर्घ काव्यरचनेचे जे प्रयत्न त्यांनी आपल्या काव्यजीवनाच्या प्रारंभीं केले ते काव्यदृष्ट्या विशेष वरच्या दर्जाचे उतरले आहेत असें म्हणतां येणार नाही. आधुनिक कवितेचें दुसरें एक महत्त्वाचें अंग म्हणजे तीमधील रोमान्सवाद होय. तांब्यांची कविता रोमँटिक कवितेमध्ये बसते याविषयी मतभेद होण्याचें कारण दिसत नाही. आधुनिक कवितेचें वाहन प्राधान्याने जातिरचना आहे ही गोष्टहि तांब्यांच्या कवितेवरून अधिकच ठसण्यासारखी आहे. भावगीतानुकूल आणि रोमँटिक वृत्ति, व रचनेकरिता जातिरचनेचा अधिकांश उपयोग केल्यानें आलेलें बाह्यरूपसाम्य; या कारणांनी तांबे हे आधुनिक कविपंचकांत न बसले तरी, नवीन काव्याच्या संप्रदायांत बसतात, व चंद्रशेखर आणि त्यांची कविता यांच्याप्रमाणे वेगळे उठून पडत नाहीत. तथापि थोड्या अधिक विचारान्तीं तांब्यांचें वेगळेपण लक्षांत येऊं लागतें. तांब्यांनी आधुनिक कवींच्या तीनहि पिढ्या पाहिल्या, पण तीमधील कोणत्याहि एका पिढीचें प्रतिनिधिपण त्यांना देता येत नाही. पहिल्या पिढींतील केशवसुत व त्यांचे समकालीन कवि दत्त, माधवानुज, विनायक आणि टिळक यांच्यांत आणि तांबे यांच्यांत विशेष निकटत्व दिसत नाही. टिळकांच्याप्रमाणे तांबे सश्रद्ध असले तरी

बोधवादी नव्हते. विनायकांच्याप्रमाणे गेय रचना करणारे असले, तरी कथा-कवि नव्हते. दत्तांच्याप्रमाणे केवळ आत्मलक्षी नव्हते. केशवसुतांचीं व त्यांचीं काव्यविषयक मतेंहि भिन्न असल्याचें प्रसिद्धच आहे. आधुनिक कवींच्या दुसऱ्या पिढींतील गोविंदाग्रज, बी, बालकवि, रेंदाळकर इत्यादींचें तांब्यांशीं निकटत्व दाखविण्याचा विचारहि कोणाच्या मनांत येणार नाही. या दोनहि पिढ्यांतील कवींचा तांब्यांच्या बरोबर विशेष परिचय असल्याचें नमूद नाही. आधुनिक कवींच्या तिसऱ्या पिढींतील, म्हणजे रविकिरण मंडळ आणि समकालीन कवींतील, कांहींचा त्यांच्याशीं दृढ परिचय होता हें खरें, तथापि या कवींच्या कवितेचा तांब्यांच्या कवितेवर परिणाम होण्याइतके तांबे नवे राहिले नव्हते; उलट तांब्यांच्याच कवितेचा या कवींवर परिणाम झाला हें उघड आहे. सारांश, मध्यभारतांतील या कवीने काव्याच्या नवीन प्रथेचा स्वीकार केला खरा, परंतु तो बहुतांशीं स्वतंत्रपणें केला होता. कोणाच्या संप्रदायांत शिरून त्याच्या छायेखाली काव्यरचना करीत तांबे राहिले नसल्याने, १९२० सालीं जेव्हा श्री. मायदेव यांनी त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित केला, तेव्हा महाराष्ट्रांतील रसिकांना त्यांची कविता वेगळी वाटली व ते तिजकडे आकृष्ट झाले. तांब्यांच्या कवितेचें वेगळेपण कशांत आहे हें कळण्याच्या दृष्टीने त्यांच्या कवितेचें स्वरूप कसें बनत गेलें हें जरा सूक्ष्मपणें पाहणें आवश्यक आहे.

कोणत्याहि कवीच्या प्रतिभेचा जिव्हाळा कितीहि जिवंत आणि जोरदार असला, तरी तिचा पहिला आविष्कार तो कवि काव्यरचनेस प्रारंभ करतो त्या वेळीं जे आदर्श त्याच्या डोळ्यांपुढे असतात त्यांच्या अनुकरणानेच होतो. गेल्या शतकाच्या शेवटच्या पादामध्ये ज्या मराठी कवींनी काव्य-लेखनास प्रारंभ केला, त्यांच्यापुढे अभ्यासाच्या क्रमांत ‘ नवनीता ’मधील मोरोपंतादि जुने कवि तर असतच; पण त्या वेळीं काव्यरचना करणारे लेंभे, आगाशे, आठल्ये, कानिटकर, वा. बा. खरे इत्यादि कवीहि अभ्यासक्रमांत नसले तरी वाचनांत असत. अभ्यासक्रमांत इंग्रजी कवि, व त्यांतहि भावगीतकवि शेली, बायरन्, वर्ड्स्वर्थ, टेनिसन् ह्यांची कविताहि त्यांना वाचावी लागे. पाल्ग्रेव्हच्या ‘ हैमकोशा ’चा आधुनिक मराठी काव्य-निर्मितीस जेवढा हातभार लागला, तेवढा ‘ नवनीता ’चा लागलेला नाही

ही गोष्ट कोणालाहि मान्य करावी लागेल. याशिवाय संस्कृत काव्याचेंहि वाचन होई. बहुतेक कवींची प्रारंभींची पुंजी एवढींच असे. कालान्तराने इतर संस्कृत किंवा इंग्रजी काव्याच्या वाचनाची भर पडे व त्याचाहि कांही परिणाम होई; पण तो विचारग्रहणापुरताच असे. त्या त्या कवीची काव्याची मूस पहिल्या कांही वर्षांत तयार होई व पुढे त्याच मुशींतून त्याची कविता बाहेर पडत राही.

तांब्यांच्या कवितेकडे धावती नजर टाकणारालाहि त्यांच्या कवितेची 'मूस' ही 'पद'रचनेच्या स्वरूपाची होती हें सहज ध्यानांत येतें. या पदांच्या रचनेंत प्रारंभीं एक ध्रुपद येई, आणि त्यानंतर चार, पांच, सहा किंवा केव्हा केव्हा अधिकहि कडवीं येत. कवितेची मुख्य कल्पना ही बहुधा ध्रुपदामध्ये ग्रथित होई, व त्या कल्पनेचें विशदीकरण वा विस्तार उपमा–दृष्टान्तांच्या साहाय्याने पुढील कडव्यांमध्ये करण्यांत येई. तांब्यांच्या काव्यजीवनाच्या उत्तरार्धांत तर त्यांच्या कवितेचें बाह्यरूप वा आकार वरील स्वरूपाचा ठरून गेल्यासारखा झाला होता. कविता -आत्मलक्षी असो की परलक्षी असो, शुद्ध भावगीत असो वा नाट्यगीत असो, प्रासंगिक असो किंवा शाश्वत भावनेचें दर्शन करणारी असो, ती बहुधा याच स्वरूपांत आविर्भूत होई. ही रचना बहुतेक रागदारीमध्ये म्हणतां येईल इतकी गेय असे. अनेक वेळा तिला कवितेपेक्षा 'गीता'चें स्वरूप मिळालेलें असे. तांब्यांच्या कवितेची मूस ही अशी उतरण्यास जीं कांही कारणें झालीं त्यांचें स्थूल स्वरूप पुढे देण्याचा प्रयत्न केला आहे.

कवीचें पौगंडावस्थेचें वय अत्यंत संस्कारक्षम असतें, व काव्यरचनेकडे त्याची पहिली प्रवृत्तीहि याच वयांत होते. तांब्यांच्या ज्या पंक्तींनी त्यांच्या गुरुला त्यांच्या प्रतिभेंतील स्फुलिंगाचें दर्शन झालें, त्या कविता मोरोपंतांच्या 'केकावली'चें अनुकरण असाव्या असें वाटतें. ताब्यांनी पुढे 'वियोगिनी' या नांवाचें एक सुमारें ६०० श्लोकांचें ऐतिहासिक खंडकाव्य लिहिलें, तें कदाचित् खरे शास्त्र्यांच्या 'यशवंतराय' महाकाव्याच्या वाचनामुळे असेल. तथापि तांब्यांच्या मनावर समकालीन नाटकांतील पदांचा परिणाम बराच झालेला असावा. १८९५ च्या सुमारास त्यांची आणि नाटककार देवल यांची

मृच्छकटिकाविषयी चर्चा झाल्याचें तांब्यांचे चरित्रकार सांगतात. याआधी किर्लोस्करांच्या शाकुंतल–सौभद्रांनी व देवलांच्या मृच्छकटिक व शापसंभ्रम या नाटकांनी महाराष्ट्रीय रसिकांचें मन मोहून टाकलें होतें व त्यांतील पदें सर्वांच्या तोंडीं जाऊन बसलीं होतीं. नाटकांतील पदांच्या चालींवर काव्य-रचना करण्यास कवींनीहि प्रारंभ केला होता. केशवसुतांनी ‘ वीरा भ्रमरा ’ ही शाकुंतलांतील व कवि विनायकांनी मृच्छकटिक, सौभद्र इत्यादि नाटकांतील अनेक चालींचा उपयोग केलेला दिसून येतो. तांब्यांसारख्या संगीत-लुब्ध कवीनेहि त्या चालींचा उपयोग केल्यास तें अगदी स्वाभाविक होतें. त्यांची पहिली गीतस्वरूपाची उपलब्ध कविता ‘ डोळे हे जुल्मि गडे ’ ही मृच्छकटिकांतील ‘ दासी ऐसें मानुनिया ’ या चालीवरील आहे; ‘ भूपती खरे ते ’ ही त्यांची दुसरी आवडती चालहि त्याच नाटकांतील आहे. ‘ मुनिकन्या ’ जातींतील त्यांच्या कवितांची मूळ चाल किर्लोस्करांच्या शाकुंतलांतील आहे. नाटकांतील या चालींबरोबर उद्धव, अक्रूर, चंद्रकान्त, अंजनीगीत या रूढ, प्रसिद्ध गाण्यांच्या चालीहि इतर कवींप्रमाणे तांबे यांनाहि आकृष्ट करित्या झाल्या. याशिवाय ‘ मुद्रिका ’ व ‘ अभिमन्यु ’ या इतर कवींनी फारशा न योजिलेल्या स्त्रीगीतांच्या चालींचाहि स्वीकार व उद्धार तांबे यांनी केलेला दिसतो. केशवसुतांनी नाटकांतील चालींपेक्षा वेगळ्या ‘ पादाकुलक ’ आणि ‘ बालानन्द ’ या चरणांतील विविध रचना-प्रकार निर्माण करून काव्यरचना केली. तांब्यांनी इतरत्र उपलब्ध झालेल्या पण अधिक गेय प्रकारांचाच उपयोग केला. काव्यांतील गेयतेबद्दलचें स्वाभाविक आकर्षण हेंच याचें कारण असावें.

पदें किंवा गीतें यांच्याबद्दलची ही आवड दृढ होण्यास आणखी एक-दोन कारणें झालीं असावीं. तांब्यांच्या काव्यवाचनांत संस्कृत कवि जयदेव याच्या ‘ गीतगोविंदा ’चाहि अंतर्भाव झालेला दिसतो. ‘ गीतगोविंदा ’मध्ये मुख्य भाग अष्टपद्यांचा आहे हें सर्वांस परिचित आहेच या अष्टपद्यांमधून ध्रुपद आणि इतर आठ कडवीं अशी सामान्यतः रचना असते. ही सर्व रचना कोणत्या तरी रागांत व तालांत म्हणावयाची अशा स्वरूपाची आहे, व त्या त्या रागाचा आणि तालाचा निर्देश त्या त्या अष्टपदीच्या प्रारंभीं करण्यांत आलेला आहे. तांब्यांनी आपली कविता अशीच रागदारीमध्ये

म्हणण्याच्या कल्पनेने लिहिली असावी असें अनुमान त्यांच्या ‘ समग्र कवितें ’-मध्येच नव्हे, तर श्री. मायदेव यांनी १९२० सालीं प्रकशित केलेल्या पहिल्या भागांतील कवितांवरूनहि होतें. ‘ समग्र कवितें ’त चाली न देतां राग व जातिनाम दिलेलें आहे, तर पहिल्या भागांत १०–१२ कवितांत नुसते रागच दिले आहेत ही गोष्ट वरील अनुमानास पोषकच आहे. पण नुसत्या राग देण्यावरूनच हें अनुमान करावयाचें असें नाही. तांबे यांनी कांही कविता जयदेवाच्याप्रमाणेच अनुप्रास-प्रचुर आणि शृंगारप्रधान अशा लिहिल्या आहेत व त्या आठ आठ कडव्यांच्या आहेत ही गोष्ट अधिक अर्थपूर्ण आहे. त्यांची ‘ ललने चल, चलुं लवलाही ’ ही कविता ( समग्र कविता, क्र० ५० ) ही या दृष्टीने अवश्य पाहण्यासारखी आहे. त्याचें पुढील ध्रुपद हें जयदेव कवीच्या रचनेची आठवण करून दिल्याविना राहणार नाहीः—

ललितलताकुंजीं स्मरमंजरि, चल चलुं लवलाही,
ललने, चल चलुं लवलाही !
रुचिराधर-धृत-मधुर-नवामृत-लोलुप बहु होई ॥ ध्रु॥

या कवितेंत पुढे आठ कडवीं आलीं आहेत. त्यांतील पुढील ओळी त्या कवितेमधील अनुप्रास-प्रचुरता सहज व्यक्त करतात. ( १ ) मनोभिरामीं या आरामीं, ( २ ) अर्धोन्मीलित कुवलय-कलिका, अलसाकुंचित लोचन-तिलका, ( ३ ) निशिगंधांचा सुगंध सुंदरि । मुखगंधें तव मंद खरोखरि इ०. सबंध कविता उत्तान शृंगारात्मक आहेत. या कवितेप्रमाणेच ‘ समग्र कवितें ’मधील क्र. २० ची ‘ कां रे जाशी मज त्यजुनी ! ’ क्र. ४० ची ‘ कळ्याकळ्यांत विहार ’, व ‘ आठवती ते दिन अजुनी ’ या कविताहि पाहण्यासारख्या आहेत. इ. स. १९०२-३ च्या सुमारास या कविता लिहिल्या गेल्या आहेत हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे. तांबे यांचा काव्यरूप-निश्चितीचा हा काल होता. पुढे १९२० सालानंतरहि अष्टपदीशीं रचना-दृष्ट्या व विषयदृष्ट्या सादृश्य असणाऱ्या कविता तांब्यांनी लिहिल्या आहेत. ‘ आज तो कुठे जिवाचा चोर ! ’ ( क्र. ११५ ), वैरिण झाली नदी ’ ( क्र. ११७ ), ‘ निष्ठुर किति पुरुषांची जात ! ’ ( क्र. १२७ ), ‘ कवणे मुलखा जाशी ! ’ ( क्र. १३० ), ‘ रतलें परपुरुषाशीं ’ ( क्र. १३१ ),

'तूं कवण जगांतिल ललना ?' (क्र. १४४) या कविता अशा म्हणतां येतील. क्र. १५८, १६०, १६१, १६२ यांत भक्ति हा विषय आहे खरा, पण अष्टपदी-रचना आहे. इतका तपशील देण्याचें कारण जयदेवाच्या रचनेची तांब्यांच्या मनावर असलेली पकड स्पष्ट व्हावी हेंच आहे. जयदेवाच्या गीतगोविन्दामधील पहिली अष्टपदी ११ कडव्यांची, दुसरी ९ कडव्यांची, व दहावी ५ कडव्यांची आहे. यांत कडव्यांच्याबाबत घेतलें गेलेलें स्वातंत्र्य तांबे यांनीहि घेतलें असल्याचें दिसतें. 'फसवणूक' (क्र. १८१, ७ कडवीं) 'उडाला हंस' (क्र. १४७, ९ कडवीं) हीं उदाहरणें अशीं आहेत.

यांतूनच तांबे यांची ७, ६, ५, ४ अशा कडव्यांच्या कवितांची निर्मिति झालेली दिसते. 'कोठे मुली जासि', 'तें कोण या ठायिं', 'ग्रीष्म', 'पहा हो कसा हा कारागीर', 'दरडीवरील बाला', 'विरहांतील चित्तरंजन', 'दृष्ट हिला लागली', 'पाक्षि पिंजऱ्यांतुनी उडाला', इत्यादि त्यांच्या कविता '**सप्तपदी**' असल्या तर 'वायो खुणव तीस', 'पूर्णाहुति', 'आज फिरुनि कां दारिं', 'कां उभी तूं तरी', 'अवमानिता', 'रुणुझुणु ये', 'घट तिचा रिकामा', 'फेरीवाला', 'जन म्हणति सावळी', 'मरणांत खरोखर जग जगतें', 'पोषाख नवनवा', 'बघुनि तया मज होय कसेंसें', इत्यादि कविता '**षट्पदी**' आहेत. पण 'सप्तपदी' किंवा 'षट्पदी' यांपेक्षा तांब्यांनी 'पंचपदी'च अधिक लिहिल्या असें दिसतें. 'अनंतस्तोत्र', 'चल जळो ज्ञानविज्ञान', 'जीवनसंगीत', 'घट भरे प्रवाहीं', 'नववधू प्रिया मी', 'घन तमीं शुक्र', 'सोन्याची घेउनि करिं झारी', 'रे अजात अज्ञात सखेजन', 'या वेळीं माझ्या रमणा', 'गे शपथ तुझी', 'घातली एकदा अता उडी', 'आलों थांबव शिंग', 'जन पळभर म्हणतिल', 'तुझे लोचन', 'उखळांत दिलें शिर', इत्यादि अनेक कविता '**पंचपदी**'च आहेत. किंबहुना जयदेवाची अष्टपदी म्हटली, तर तांब्यांची '**पंचपदी**' असें म्हणावयासहि हरकत नाही. पंचपदीपेक्षा संख्येने कमी, पण षट्पदी, सप्तपदी इतक्या 'चतुष्पदी'हि तांब्यांच्या कवितेंत आहेत.

तांब्यांच्या कवितेचा बाह्याकार बऱ्याच अंशीं जयदेवाच्या कवितेवरून

ठरला. जयदेवाची ही कविता नुसती काव्यस्वरूपाची असण्यापेक्षा गीत-स्वरूपाची होती हें उघड आहे. तांब्यांच्या पुष्कळशा कवितेचें स्वरूप तसें आहे. त्यांचा टेनिसन्‌चा अभ्यासहि त्यांच्या कवितेचें गीतस्वरूप ठरण्यास कांहीं प्रमाणांत तरी कारण झाला असावा. टेनिसन् हा आपला आवडता कवि असल्याचें तांबे यांनीच आपल्या ' पाडवा ' या कवितेच्या शेवटीं सूचित केलें आहे. त्याच्या " ब्रूक " या कवितेचें त्यांनी रूपान्तर केलें होतें. त्याप्रमाणे ' प्रिन्सेस् ' काव्यांतील ' Come down, O Maid ' या गीताचें ' प्रीतीचा वास ' या कवितेंत केलें होतें. टेनिसन्‌ची स्वतःची ' गीत ' ( Song ) विषयक आवड तांबे यांना समानधर्मीयाची जाणीव करून देणारी झाली असावी. टेनिसन्‌चें ' इन् मेमोरियम् ' मुखोद्‌गत असणाऱ्या या टेनिसन्‌भक्ताच्या कवितेंत आपल्या आदर्शांमधील गीतानुरक्ति उतरावी हें अगदी साहजिकच होतें.

तांबे यांच्या बऱ्याच कवितेचें रूप नाट्यगीताचें आहे ही गोष्टहि येथे विचारांत घेतली पाहिजे. नवीन संप्रदायांतील बहुतेक कवींचें काव्य हें आत्मनिष्ठ व आत्मलक्षी असतां तांबे यांची कविता अनेक वेळा इतरांच्या अंतःकरणांत प्रवेश करून त्यांच्या भावना प्रकट करिती झाली हेंहि आधुनिक कवींच्या पहिल्या दोन पिढ्यांच्यापेक्षा तांब्यांचें वेगळेपण व्यक्तविणारें आहे. या नाट्यगीतांना इंग्रजीमध्ये ' ड्रॅमॅटिक् लिरिक्स् ' अशी संज्ञा आहे; आणि या विशिष्ट संज्ञेखाली अशी रचना करणारा पहिला प्रमुख कवि ब्राउनिंग् हा होता. तांबे यांनी ब्राउनिंग्‌च्या कवितेचा चांगला अभ्यास केला होता. तेव्हा भावगीत तर खरेंच, पण आपल्या भावनेचा आविष्कार करण्यापेक्षा पर–भावनेचें आविष्करण करणारें असें नाट्यगीत, हा रचनाप्रकार तांबे यांनीहि आपल्या काव्यांत आणावा ही गोष्ट त्यांच्या ब्राउनिंग्‌च्या अभ्यासाचें फल म्हणतां येईल. तांब्यांच्या विधवा-विषयक कविता विधवेच्या मनांतील सूक्ष्म भावनांचें दर्शन करणारीं नाट्यगीतेंच होत. त्याप्रमाणेच ' अवमानिता ', ' माहेरची आठवण ', ' वाटेच्या वाटसरा ', ' ग्रीष्म ', ' वायो ! खुणव तीस ', ' पन्नास वर्षांनंतर ', ' चौघडा झडतो ' इत्यादि प्रसिद्ध कविता नाट्यगीतेंच आहेत. नाट्याचा एक विशेष जो संवाद तोहि ' जमादार ', ' दिव्यांगनेची ओढ ', ' आज फिरुनि कां दारिं ',

'माळिण', 'अहो धन्वंतरी !', 'राजकन्या व तिची दासी', इत्यादि कवितांतून आला आहे. ब्राउनिंग्च्या ड्रॅमॅटिक् लिरिक्मधून एकीकडे गद्यांत नाट्यछटा व दुसरीकडे पद्यांत नाट्यगीत अशा दोन वाङ्मयप्रकारांची भर मराठी वाङ्मयांत पडली आहे तांब्यांच्या कवितेची गीतात्मक व त्यांतहि नाट्यगीतात्मक मूस ही या प्रक्रियेने तयार झाली आहे. ही मूस १९०२ ते १९०८ या कालखंडांत पक्की होऊन त्यापुढील कालांतील त्यांची कविता बाह्यरूपाच्या दृष्टीने प्राधान्याने जवळजवळ याच एका प्रकारची उतरली आहे असें दिसून येतें. रचनावैविध्याच्या दृष्टीने त्या प्रमाणांत तींत उणेपणा आला हें अर्थात् सहज लक्षांत येण्यासारखें आहे. आधुनिक काव्यांतील तांबे-पद्धतीचें बाह्यरूप हें असें आहे.

आपल्या काव्यलेखनाला तांबे यांनी १८९० च्या सुमारास प्रारंभ केला; पण त्याला गति येण्याला चार–पांच वर्षे जावीं लागलीं असावीं. प्रारंभींच्या या कवितेंत 'संस्कृतप्रचुर रचना, पदलालित्य, बहिर्मुखता, थोडा–फार उत्तान शृंगार, कल्पनीयाचा अभाव' इत्यादि गोष्टी असाव्यात असें त्यांचे चरित्रकार सांगतात व तें खरें असावें. 'त्यांत बाह्य सौंदर्याचीच प्रतिष्ठा' अधिक असावी, म्हणजे तरुण वयांत ज्या रसाची आवड असा-वयाची, त्यांत प्रधान असणाऱ्या सौंदर्याचें वर्णन अधिक असण्याचा संभव होता. असेंहि सांगण्यांत येतें की, "कांही जुन्या लावण्यांतील भावनावेग व अनुरूप शब्दयोजना यांच्या संयोगाने त्यांत आलेला उठावदारपणा पाहून भास्कररावांना स्वतःची रचना हिणकस वाटूं लागली, व ते आपल्या 'निर्जीव' कवितांची होळी करण्यास सिद्ध झाले." उत्तान शृंगार हा ज्या कवितांचा एक विशेष, त्याहि कविता जुन्या शाहीरांच्या मानाने हिणकस वाटाव्या यावरून त्यांच्या स्वरूपाची कल्पना काय येईल ती येवो, पण एवढी गोष्ट खरी की, तांबे यांनी या कालांतील आपली रचना नष्ट करून टाकली, व १८९० ते १९०० या १० वर्षांच्या कालखंडांतील फारच थोडी कविता आज उपलब्ध आहे. त्यामुळे त्यांच्या काव्यलतिकेचा पहिला बहर १९०२–३ या सालातील होय असें म्हणावें लागतें. या दोन वर्षांतील सुमारें चाळीस कविता आज उपलब्ध आहेत. पण १९०३ नंतर हा बहर ओसरला व पुढील ५–६ वर्षे वर्षाकाठीं दोन–चार–सहा

यापेक्षा अधिक काव्यनिष्पत्ति होऊं शकली नाही. तांबे हे आपल्या काव्य-निर्मितीविषयीं बेफिकीर असल्याने कांही कविता गहाळ झाल्या असें म्हटलें तरीहि हीं वर्षे काव्यनिर्मितिदृष्ट्या अवर्षणाचींच समजावयास हवींत. १९०३ ते १९०८ या कालांत तांबे यांनी वाचन मात्र खूप केलें. इंग्रजी व संस्कृत मूळ वाङ्मयकृति व टीकावाङ्मय आणि साहित्यशास्त्र या सर्वांचाच व्यासंग तांबे या वेळीं करीत होते. कदाचित् इतरांच्या वाङ्मयाच्या वाचनांत स्वत: स्वतंत्र निर्मिति करण्याकडे दुर्लक्ष झालें असेल. पण थोडथोडी का होईना, १९१० पर्यंत काव्यरचना होत तरी होती. १९१० ते १९१८ यामधील कालांतील एकहि कविता उपलब्ध असू नये ही गोष्ट मात्र लक्षांत घेण्या-जोगी आहे. तिची कारणमीमांसा आजवर कोणीं केलेली दिसत नाही. १९१८ मध्ये लिहिलेल्या २-३ कविता आहेत. याच सुमारास मायदेवांनी त्यांचा संग्रह प्रकाशित करण्याचें मनावर घेतलें व १९२० अखेर तो प्रसिद्धहि झाला. योगायोग असा की याच वर्षी तांबे यांच्या सर्वांत अधिक कविता लिहिल्या गेल्या. त्यांपैकी कांही थोड्याच या पहिल्या संग्रहांत आलेल्या असल्या, तरी आपल्या कवितेस एक रसिक मिळाला असून संग्रहरूपाने तो आपली कविता इतर रसिकांपुढे ठेवणार आहे या कल्पनेने प्रोत्साहन मिळून त्यांच्याकडून बरीच काव्यरचना झाली असणें अगदी शक्य आहे. अकस्मात् आलेला हा प्रतिभेचा बहर पुढील दोन वर्षे टिकला व या तीन वर्षांच्या कालांत तांब्यांनी सुमारें ७५ कविता लिहिल्या. मरणविषयक त्यांच्या ९-१० कविता याच कालांतील आहेत. यानंतर हा बहर ओसरला तो १९३५ पर्यंत असें म्हणावें लागतें. मध्यंतरींच्या कालांत पांच-सात कविता दर वर्षी लिहिल्या जात असल्या, तरी एखाद्या वर्षी मुळीच लेखन झालें नाही, किंवा १९३० ते १९३२ या तीन वर्षांतहि लेखन झालें नाही, असेंहि झालें. स्वत: तांबे यांनाहि ‘ मधुघट रिकामे ’ पडत असल्यासारखें वाटूं लागलें होतें. पण पुन: काय झालें कोणास ठाऊक, १९३५ सालीं अखेरचा मोठा बहर येऊन या वर्षी त्यांच्याकडून ३० कविता लिहिल्या गेल्या. पुन: १९३७ ते ४० या वर्षांत कांहीहि लिहिलें गेलें नाही. प्रकृतीच्या अस्वास्थ्याचा काव्यरचनेवरहि

परिणाम झाला असावा. शेवटच्या वर्षी म्हणजे १९४१ साली ज्या चार कविता लिहिल्या आहेत, त्यांतील अखेरच्या कविता परमेश्वरास उद्देशून होत्या. त्यांतून पर-पुरुषाचा वेध लागलेला स्पष्ट दिसतो. तांब्यांच्या कविता-रचनेचा कालेतिहास असा आहे.

आपल्या स्वाभाविक प्रवृत्तीमुळे, आणि इतरांच्या काव्याचे जे संस्कार झाले त्यांच्याहि परिणामाने, तांबे यांनी आपल्या कवितेची जी मूस तयार केली, तीमध्ये त्यांनी जो रस ओतला, तो प्राधान्याने प्रणयाचाच होता. तांब्यांच्या बहुसंख्य कविता प्रेमाची कोणती ना कोणती तरी छटा रंगवि-णाऱ्या आहेत. आधुनिक काव्यावर घेण्यांत येणारा प्रणयप्राधान्याचा आक्षेप तांबे यांच्या कवितेवरहि येतो. पण त्यामुळे त्यांची मनोवृत्ति रोगट झालेली होती असें मात्र कोणी म्हणू शकत नाही, कोणीं म्हटलेंहि नाही. याचें कारण तांबे हे स्वतः प्रेमाच्या बाबतींत आत्मतृप्त असल्याने ('एक सखीच्या हृदयिं पूर्णता मज लाभे संसारीं' असें ते म्हणतात) आपल्या वैयक्तिक नैराश्याचीं किंवा तन्मूलक वैफल्याचीं गाणीं लिहिण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधीहि आला नाही हें होय. आपल्या प्रारंभींच्या विवाहपूर्व कवितांत त्यांनी काय लिहिलें हें आज सांगतां येत नसलें तरी, त्यांत नैराश्य नसून सफल सुखी प्रेमाचीं चित्रें असण्याचाच संभव त्यांच्या त्यांपैकी आज उपलब्ध असलेल्या 'डोळे हे जुलिम गडे' या कवितेवरून वाटतो; व जी कविता उत्तानपणामुळे तांबे यांनी नष्ट केली, ती नैराश्य वर्णन करणारी असणें सामान्यतः अशक्यच म्हणावयास हवें. विवाहोत्तर पत्नीवरील प्रेमाच्या ज्या अनेक कविता त्यांनी लिहिल्या त्यावरून त्यांचें प्रेमविषयक समाधान उत्कटत्वाने व्यक्त होत आहे. 'कान्ते! त्वन्मूर्ति येतां अनुपम शयनागार लागे खुलाया,' किंवा 'सहज तुझी हालचाल मन्त्रें जणुं मोहिते' असेच उद्‌गार तांबे यांनी आपल्या पत्नीविषयी काढावे, व 'हें माझं भाग्य वघुन जळफळतिल देव ते' अशी धन्यता त्यांना वाटावी असें प्रेमजीवन वैयक्तिक जीवनांत लाभल्यावर वैयक्तिक नैराश्याचें प्रकटन काव्यांत होण्याचें कारणहि नव्हतें, व वैकल्य किंवा पीडितत्व हे आक्षेपहि येण्यासारखे नव्हते. असें असूनहि प्रणय हाच त्यांच्या काव्याचा प्रधान विषय होता ही गोष्ट तितकीच खरी आहे. आपल्या प्रेमाच्या बाबतींत संपूर्ण समाधान लाभल्याने केवळ

आपल्याच प्रेमांत ते गुरफटून राहिले असें मात्र झालें नाही. कदाचित् त्याचमुळे इतरत्र जेथे जेथे काव्यास योग्य अशी प्रेमाची छटा त्यांना दिसली तेथे तेथे नेमकें बोट ठेवून त्याचें चित्र त्यांनी काढलें आहे. स्वतःच्या प्रेम-तृप्तीच्या धुंदींत इतरांच्या प्रेमनिराशेबद्दल सहानुभूतीचा अभाव त्यांनी कधी प्रकट केलेला नाही. सफल प्रेमाइतकेंच विफल प्रेमाच्या दर्शनाने त्यांचें मन आकृष्ट होई, व मग, ' पन्नास वर्षांनंतर ' किंवा ' वाटेच्या वाटसरा ' यां-सारख्या हृदयास हात घालणाऱ्या कविता निर्माण होत. प्रेमभावनेचें सूक्ष्म असें दर्शनहि तांबे यांना लक्षवेधक वाटे, मग ती उंच गडावर असो कीं खाली दरींत असो. अगदी अखेरच्या वर्षीं लिहिलेल्या कवितांतहि ' कोठे मुली जासि ' म्हणून त्यांनी एका प्रणयिनीस हटकलेलें दिसतें. वयाची साठी उलटून गेल्यावरहि तरुणांच्या मनांतील प्रेमाच्या हालचालींबद्दल त्यांना कुतूहल वाटे, हें १९३५ सालीं १५–२० प्रेमविषयक कविता त्यांनी लिहिल्या यावरून दिसून येतें. स्वतःच्या किंवा इतरांच्या प्रणयभावनेबद्दल त्यांना कधी ओशाळगत किंवा अनुचितत्व वाटलें नाही. म्हणून पहिल्या-पासून अखेरपर्यंत त्यांनी आपल्या कवितेचा तोच प्रधान विषय ठेवला. प्रेमकवितांची संख्या, प्रेमविषयास प्राधान्य व प्रेमाच्या विविध छटांचें दर्शन या सर्व दृष्टींनी खरोखरच तांबे यांनाच ' प्रेमाचे शाहीर ' म्हणावयास हवें.

तांबे यांच्या कवितांतील प्रेमदर्शनांतील विविधता खरोखर लक्षणीय आहे. प्रेमाच्या बाबतींत ते जितके अंतर्मुख, तितकेच, किंबहुना अधिकच, बहिर्मुख असल्याने ही विविधता आली आहे. कवि आपल्या स्वतःच्या प्रेमांतच गुंतून राहिला म्हणजे त्याच्या प्रेमकल्पनांत साहजिकच एकसुरीपणा येतो. आपल्या प्रेमामध्ये अपयश आलें असल्यास दुसऱ्यांच्या प्रेमदर्शनांतील मौज त्याला आकृष्ट करूं शकत नाही, व मग व्यक्तीव्यक्तींच्या भिन्नभिन्न प्रेमकथांतील वैचित्र्य त्याच्या ध्यानांत येत नाही. तांबे यांना इतरांच्या प्रेमाकडे पाहतां आलें व म्हणून त्यांच्या प्रेमकवितांत विविधता आली. विधवेच्या प्रेमाविषयींच्या त्यांच्या कविता पाहिल्या तरी हें सहज दिसून येतें. अगदी पहिल्या कवितेंत मृत पतीच्या सहवासाच्या कल्पना तिच्या मनांत कशा वागत असतात हें दाखविलें आहे ( विधवेचें स्वप्न ). यानंतरच्या कवितेंत पहिला पति थोडासा विस्मृत होऊन दुसऱ्या व्यक्ती-

विषयीच्या भावना मनांत मनाविरुद्धहि कशा येतात, व ती निःशब्द आत्मयज्ञ कसा करते तें अगदी नाजुकपणें चित्रित केलें आहे (निःशब्द आत्मयज्ञ). त्यापुढील चित्रांत दुसऱ्या व्यक्तीस पाहून 'कसेंसें होत असल्याची कबूली,' स्वतःजवळच का होईना, देणारी, पण हें योग्य नव्हे असें वाटणारी व्यक्ति चित्रित केली आहे (बघुनि तया मज होय कसेंसें). स्वतःशींच दिलेली ही कबूली पुढील कवितेंत दुसऱ्या पुरुष-व्यक्तीलाहि व्यक्त करून, पण 'दासी होइन, बहीण होइन, अधिक पत्निपणिं काय' असें विचारून विवाह मात्र न करणारी विधवा पुढील कवितेंत दिसते (हिंदु विधवेचें मन). आणखी एका कवितेंत, 'मी पतिविरहित, शंकित नयनें, बघति लोक मज; मीं न मनुज का? काय न मज मन? नच्च विकार का?' अशी कांहींशी सामाजिक स्थितीविरुद्ध तक्रारहि ती करिते (चरणाखालिल हाय मीच रज). पण अखेर समाजाची भीड बाजूला टेवून विवाहास उद्युक्त झालेली व 'ते कान्त यापुढे, मीहि तयांची कान्ता' असा निर्धार व्यक्त करण्याइतकी तिची प्रगति झाल्याचें दिसतें. सारांश, प्रेमाचें क्षेत्र विधवेपुरतें मर्यादित केलें तरी, त्यांत पांच–सहा वेगवेगळ्या व सूक्ष्म भेद दर्शविणाऱ्या ५–६ अवस्था तांबे पाहूं शकतात व रंगवूं शकतात. त्यामुळे त्या प्रेमचित्रांत वैचित्र्य येतें.

तांबे यांची प्रेमविषयक सहानुभूति अर्थात् विधवेपुरती मर्यादित नाही. त्यांनी इतर अनेक स्त्रियांचीं व विविध वयोवस्थांतील प्रेमांचीं चित्रें काढलीं आहेत. अगदी बाल्यापासून ते वार्धक्यापर्यंतहि हीं प्रेमचित्रें किंवा प्रणयाचें सूक्ष्म दर्शन झालेलें तांब्यांच्या कवितेंत दिसून येतें. अगदी लहान असलेल्या, किंबहुना अर्भकावस्थेंत असलेल्या मुलीला उद्देशून 'कुणि असेल ग, असेल बोबडकांदा' अशी तिच्या भावी वयावरून थट्टा करण्याची संधि कवि सोडीत नाही. यापुढील ८–१० वर्षांच्या मुलीचीहि अशीच गंमत केलेली 'तर मग गट्टी कोणाशीं' या कवितेंत दिसेल. पुढे समजूत आल्यानंतरच्या अवस्थेंतील, मुग्ध अशा तरुणींचीं प्रेम-चित्रें तर पुष्कळच आहेत. राज-कन्येच्या दासीने केलेली तिची चेष्टा, प्रेमज्वराने पीडित अशा तरुणीला 'दृष्ट लागली' असें म्हणणाऱ्या बायकांची खोटी समजूत, 'दयिताचें चिंतन करण्यांत घट भरून वाहूं' लागल्याचें लक्षांत न येणारी दयिता, किंवा तो घट रिकामा राहिला असतां कोणाची तरी शीळ ऐकूं आल्याने अदृश्य होणारी

तरुणी, चहूकडे ढगांच्या माळा दिसत असतां दरडीवर कोणाची तरी वाट पाहणारी बाला, संध्याकाळीं सर्व घरोघर परतलेले असतां एकटीच शेताच्या बांधावर उभी असलेली हरिणनयना, अपरात्रीं पाहरा चुकवून वाड्या-बाहेर जाऊं पाहणारी कंवराणी, इत्यादि प्रेमी स्त्रियांचीं चित्रें तांबे मोठ्या तन्मयतेने काढतात. अचिरविवाहित स्त्रीचें आपल्या पतीचें कौतुक करण्याच्या मनःस्थितीचें चित्र ' बिजली जशि चमके त्यारी ' किंवा ' ग्रीष्म ' या कवितेमध्ये आलेलें आहे. पति आपल्याकडे डोळे रोखून पाहत असतां हातांतील काम नीट न होण्याचा प्रसंग ' डोळे हे जुल्मि गडे ' या सुप्रसिद्ध कवितेंत तांबे यांनी संयमाने व फार थोडक्यांत रंगविला आहे. या चित्रांबरोबर प्रौढ अशा विवाहित स्त्रियांचें पूर्ववयांतील अयशस्वी प्रेम किती दुःखदायक होतें याचीं चित्रेंहि ' वाटेच्या वाटसरा ! ' आणि ' आज फिरुनि कां दारिं ' या कवितांतून काढलेलें दिसेल. सामजिक सुधारणेचें निशाण हातीं घेतलेल्या इतर कवींनी स्त्रीप्रेमाचीं इतकीं हृदयस्पर्शी व विविध चित्रें काढलेलीं दिसत नाहीत. तांबे यांची स्त्रीजातीविषयींची भावना त्यांनी ' भयचकित नमावें तुज रमणी ' या कवितेंत प्रकट केलीच आहे. स्त्रीजाती-विषयींच्या आदराच्या पोटींच त्यांची स्त्रीच्या प्रेमाबद्दलची सहानुभूति निर्माण झालेली असावी. आणि या प्रेमाचें प्रकटन कितीहि मोकळें व स्पष्ट असलें, तरी त्यांत अश्लीलता डोकावत नाही याचें कारणहि स्त्रीविषयक आदर, अनुकंपा व सहानुभूति या त्यांच्या भावना होत्या हें आहे.

स्त्रियांच्या मानाने त्यांची पुरुषप्रेमविषयक सहानुभूति कमी असावी असें वाटतें. तथापि तींहि चित्रें तांब्यांच्या कवितेंत सापडतात. ' वायो, खुणव तीस ' या कवितेमधील निराश, निरपेक्ष प्रेम, किंवा ' तें कोण या ठायिं ' या कवितेमधील ' अबोध ' प्रेमस्मृति, ' हें पिसें सोड ' असें कितीहि सांगितलें तरी तरुणास लागलेली दिव्यांगनेची ओढ, प्रेमनिराशेने भगवें घेतलेला पण तरीहि दयितेपासून दूर राहूं न शकणारा जोगी, किंवा ' पन्नास वर्षांनंतर ' आपल्या प्रेयसीचीच जणूं प्रतिकृति अशी नात पाहून हृदय खळबळून आलेल्या विधुराचे उद्गार हीं सर्वत्र पुरुषप्रेमाचीं खोल व म्हणून हृदयस्पर्शी अशीं चित्रें आहेत. ' म्हाताऱ्या नवरदेवा 'ची थोडी गंमत जरी तांबे यांनी केलेली असली, तरी कोणाच्याहि योग्य प्रेमभावनेची

अनुदार अशी थट्टा त्यांनी केली नाही. प्रेमांतील नैराश्याने निर्माण झालेल्या कडवटपणामुळे लेखक वा कवि प्रेमाची थट्टा करण्यास प्रवृत्त झालेले दिसतात. पण तांब्यांचा तद्विषयक अनुभव अनुकूल असाच असल्याने ते ' प्रेम हें विष आहे, दाहक आग आहे, हठयोग आहे, किंवा त्याकरिता मरावें लागतें ' अशा प्रकारचे विचार सहसा प्रकट करीत नाहीत.

तांब्यांच्या कांही कविता वरवर प्रेमविषयक वाटतात. परंतु त्यांचा खरा विषय परमेश्वर-भक्ति हा आहे. त्यांची सुप्रसिद्ध कविता ' नववधू प्रिया मी बावरतें ' ही अशी कविता मानण्यांत येते. जीवात्मा हा वधू व परमात्मा हा वर, त्याचेकडे जावयाचें म्हणजे खरोखरच वरींच जायचें, पण त्याला या पृथ्वीवरील जीवनाचाच अधिक लळा लागला असल्याने तिकडे जाणें कठीण वाटतें. तो प्राणसखा आहे हें कळत असूनहि त्याच्या-जवळ जायला मन भितें असा त्या रूपकाचा अन्वय लावतां येतो. सरळ अर्थ असा व्यंजनेने सांगितल्याने व त्यांतहि नववधूचें रूपक मूळांत चमत्कृतिपूर्ण असल्याने ही कविता चांगली उतरली आहे यांत शंका नाही. नववधूच्या रूपकापलीकडे जाऊन ' पर-चुंबनमधु पिऊन पुसति वधु का शिळपट नवऱ्याशीं ' किंवा ' रतलें पर-पुरुषाशीं ' अशा शब्दांत तांबे लिहूं लागतात, तेव्हा मात्र भावनेच्या प्रामाणिकपणापेक्षा अर्थचमत्कृतीकडे कवि अधिक पहात आहे असें वाटतें. पर-पुरुषाची कल्पना जगन्नाथ पंडिताने पूर्वी योजिली होती हेंहि अर्थात् लक्षांत येतें. ' रे चेटक्या ' ही कविताहि या पद्धतीची आहे. परंतु इतकी चमत्कृति न आणतां तांबे जेव्हा साध्या रूपकावर भागवितात, त्या वेळीं त्यांची भावना अधिक प्रामाणिक वाटते. ' स्वारी कशी येईल ', ' पोषाख नवनवा मला दिला ', ' घातली एकदा अता उडी ', ' या वेळीं माझ्या ये रमणा ', ' या प्रकाशशिखरीं ' इत्यादि कवितांत आलेली भावना खरी वाटते. तांबे हे प्रथमपासूनच श्रद्धाळु व आस्तिक होते. कांही कविता रूपकाशिवायच परमेश्वरास उद्देशून त्यांनी लिहिल्या आहेत. ' प्रभु तुज कवणेपरि ध्याऊं ', ' अनंत-स्तोत्र, ' ' निशिदिन तुज हरि, ध्याइन का मी ', ' चरण कधी का पाहिन आई ', ' वंदन व्हावें हरि मम जीवित ' व अखेरच्या ' पुनः पुनः यावें ', ' तुझे चरण पाहिले ', या

कविता अशा आहेत. तांब्यांच्या प्रेमकवितांच्या खालोखाल संख्येने त्यांच्या ईश्वर-विषयक कविताच येतात. ईश्वरविषयक प्रेम, श्रद्धा व आस्तिक्यबुद्धि यामुळे तांबे यांची मनोघटना इतर आधुनिक कवींच्यापेक्षा, टिळकांचा अपवाद सोडल्यास, भिन्न झालेली होती. कोणत्याहि अवस्थेंत या गोष्टीमुळे एक आधार, एक शक्ति मिळाल्यासारखें होई. केशवसुतांच्या अज्ञेयवादान त्यांच्या सांप्रदायिकांत परमेश्वराच्या अस्तित्वाविषयी नसली, तरी त्यांच्या दयालुत्वाविषयी साशंकताच निर्माण झालेली होती. म्हणून गोविंदाग्रजांच्या पिढींतील कवींत नैराश्याची वृत्ति जोर धरून असे. तांब्यांच्या श्रद्धेने १९२१ सालीं मृत्यूचें भय उत्पन्न झालें असतां त्यांना धीर दिला. एवढेंच नव्हे तर पुढे वीस वर्षांनी मृत्यु खरोखरच आला, त्या वेळीं ' भाग्य उजळलें ! तुझे चरण पाहिले ', अशी समाधानाची वृत्ति त्यांना लाभली होती. कदाचित् यांतूनच ' भोग कुणा सुटले ' ही वृत्ति निर्माण होऊन सामाजिक रूढीविरुद्ध बंड करून उठण्याची बुद्धि तांब्यांना झाली नाहीं आपल्या ' रुद्रास आवाहन ' या कवितेंत क्रान्तीस बोलावीत असल्याचा भास झाला, तरी रूढीविरुद्ध बंड आणि सामाजिक क्रान्ति या कल्पना तांब्यांच्या डोळ्यांपुढे फारशा नसाव्या असें वाटतें. विधवांचें दु:ख त्यांनी आपल्या कवितांतून चित्रित केलें असलें, तरी समाजाविरुद्ध तळमळून चिडून ते बोलत नाहीत. सामाजिक व्यवस्थेंत कांही विशेष बिघडलें आहे याची तीव्र जाणीव त्यांना असावी असें दिसत नाही. समतेचा उद्घोष इतर अधुनिक कवींप्रमाणेच त्यांनी केला नाही. फार झाल्यास परमेश्वराच्या रुद्ररूपास आवाहन केलें म्हणजे झालें. काव्यदृष्ट्या ते आधुनिक कालांत असले, तरी सामाजिक दृष्ट्या ते पूर्वीच्या वातावरणांतच असावेत. त्यांच्या कांही कवितांवरूनहि हें व्यक्त होतें. राजकन्या व तिची दासी, कंवराणी व परवलीचा शब्द विचारणारा जमादार, दारावरून फेऱ्या मारणारा फेरीवाला, पान्थांचे उल्लेख, संन्यास घेणारे तरुण, माळीण, वैद्य व प्रणय-पीडित स्त्री, रात्रीं–पहाटे अभिसरणाला निघालेल्या स्त्रिया, या व इतर अनेक खुणांवरून तांबे हे अद्यापि आपल्या भोवतालच्या संस्थानी वातावरणास जुळणाऱ्या कालांतच मनाने राहत असावेत असें वाटतें. काव्याची आधुनिक

परंपरा ही सामाजिक क्रान्तीची परंपरा मानल्यास तांबे तीमध्ये बसतील की नाही याबद्दल शंका आहे.

आणखी एका बाबतींत ते आधुनिकांच्या परंपरेंत नीट बसणार नाहीत. ती म्हणजे निसर्गप्रेमाची. केशवसुत-परंपरेमध्ये निसर्गाला बरेंच महत्त्वाचें स्थान असे. केशवसुत, टिळक, बालकवि या सर्वांनी निसर्गाची थोरवी गायिली. व्यावहारिक मानवी जीवनांत जें दिसत नाही तें निसर्गात पाहण्याचा प्रयत्न त्यांनी केला. तांब्यांना निसर्गापेक्षा मानवाविषयींच्च अधिक आस्था व कुतूहल होतें. याचा अर्थ निसर्गविषयक कविता त्यांनी मुळींच लिहिल्या नाहीत, किंवा निसर्ग-वर्णनें त्यांच्या कवितेंत आलीं नाहीत असें नव्हे. आपल्या काव्यजीवनाच्या प्रारंभींच टेनिसन्च्या ' ब्रूक ' या कवितेचें रूपान्तर त्यांनी केलें. पण त्यांत भाषान्तरप्रयत्नापेक्षा अधिक अर्थ पाहणें शक्य नाही. ' गुराख्याचें गाणें ' या कवितेंतील निसर्गवर्णन सांकेतिक असल्याचें त्यांचे भक्तहि मान्य करितात. ' सन्ध्या-तारक ' ही कविताहि त्याच पद्धतीची आहे. बुल्बुलास उद्देशून लिहिलेली कविता खरोखर प्रेमगीतच आहे. ' सखये, या स्थानीं ' या कवितेबद्दलहि सांकेतिकतेचा आक्षेप येईलच. ' रासमंडळ ', ' आनंदी आनंद ' इत्यादि कविता निसर्गपर असून केशवसुत संप्रदायांतील इतर कवितांत सहज बसण्यासारख्या आहेत. ' तृणाचें पातें ' व ' पहा हो कसा हा कारागीर ' या कवितांतून निसर्ग-सौंदर्य-दर्शनाचें तांबे यांचें सामर्थ्य स्पष्ट दिसतें, पण त्यांत अखेर त्या सौंदर्याचा निर्माता परमेश्वर याबद्दलचें प्रेमच व्यक्त होतें. तांबे यांची निसर्गाकडे पाहण्याची वृत्ति मात्र केशवसुत संप्रदायापेक्षा वेगळी होती. ' तिमिरीं आम्ही नित्य रखडणें । विवंचनांतचि जिणें कंठणें ' अशी आपली स्थिति असल्याने, किंवा ' अपूर्ण अपुलें ईप्सित जेथे पूर्ण दिसे झालें ' अशा वृत्तीने, तांबे निसर्गाकडे वळत नाहीत. दुःखाच्या वेळीं निसर्गापेक्षा परमेश्वराकडेच ते वळतात. म्हणून निसर्गाचा बडिवार त्यांनी फारसा चालविला नाही. त्यांतील सौंदर्य ते पाहतात, तें बहुधा ते सौंदर्यवादी कवि होते म्हणून. निसर्ग हा मानवी जीवनाची पृष्ठभूमि या दृष्टीनेच त्याचें वर्णन करणाऱ्या ' ग्रीष्म ', ' ये पहाटच्या तारा गगनीं ', ' रुणुझुणु ये ' इत्यादि कविता त्यांनी लिहिल्या आहेत. केशवसुतांप्रमाणे निसर्गाबद्दलची सभय शरणागतीची वृत्ति त्यांची

नव्हती, किंवा मानवाकडे दुर्लक्ष करून केवळ ' निसर्गाचा अभ्यास ' कर अशा प्रकारची बालकवींची वृत्तीहि नव्हती. निसर्ग आणि मानव यांच्यामधील तारतम्य तांबे यांनी सोडलें नाही.

तांबे यांचें गूढगुंजन खरोखर फारसें गूढ नसतें. सरळ प्रत्यक्ष निवेदनापेक्षा पर्यायाने, रूपकाने, म्हणजेच रूपकावर आधारलेल्या अतिशयोक्तीने, निवेदन केल्यास काव्यदृष्ट्या अधिक वेधकता येते. या सर्वमान्य तत्त्वावर अधिष्ठित असें त्यांचें गूढगुंजन होतें. याकरिता स्वीकारलेलीं प्रतीकें रसिक वाचकांस परिचित अशीं निवडण्याची काळजी ते घेत, किंवा सहजगत्याच त्यांच्याकडून निवडलीं जात. या परोक्ष भाषेंत केलेल्या निवेदनांत रवीन्द्रांच्या काव्यवाचनाच्या परिणामाचा हातभार असणें शक्य आहे. रवीन्द्रांच्या ' गार्डनर ' या संग्रहांतील अनेक कल्पनांशीं तांबे यांच्या कवितेमधील कित्येक कल्पनांचें साम्य दाखविण्यांत आलें आहे. पण यांत वाङ्मयचौर्याचा भाग नसून वाङ्मयपरिणामाचाच आहे यांत शंका नाही. ' गार्डनर 'मधील कल्पना कवीने इतक्या आत्मसात् केल्या होत्या की कवीस न कळतच त्या त्याच्या काव्यांत उतरत. याचें गमक असें की त्या कल्पनांचा मूळांतील संदर्भ व तांबे यांनी योजिलेला संदर्भ हा बहुधा एक नसतो. रवीन्द्रांच्या काव्याचा अनुवाद करण्याचा हेतु तर कोठेच दिसत नाही. रूपकात्मक भाषा योजण्याची पद्धतीहि केवळ रवीन्द्रांनीच स्वीकारली होती असें नाही. नववधू व पर-पुरुष यांसारखीं रूपकें तर जुन्या संस्कृत कवितेंत येऊन गेलेलीं होतीं. या रूपकपद्धतीचा उपयोग तांबे यांनी केवळ आपात-शृंगारिक, पण परमेश्वरपर कवितेकरिता केला असेंहि नाही. स्वतःच्या काव्यविषयक घटनांसंबंधी ( मधुघट ), मित्राच्या मृत मुलाविषयी ( उडाला हंस ), प्रियकराकडे पळून गेलेल्या प्रेयसीविषयी ( उडाला पाक्षि पिंजऱ्यांतुनी ) किंवा स्वतःच्या आजारीपणामुळे उत्पन्न झालेल्या मृत्यूच्या कल्पनेवरून तांब्यांनी याच पद्धतीची काव्यरचना केली आहे. तांबे यांचीं हीं रूपकें सहजगम्य असल्याने व अशा कवितांतहि मध्येच कोठे तरी मूळ उपमेयभूत गोष्टीचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष ओझरता निर्देश होत असल्यामुळे हें सर्व क्लिष्ट न होतां उलट काव्यमयच होतें. तांबे या कवितांतून खोल तत्त्वज्ञान शिकविण्याचा प्रयत्न सहसा करीत नाहीत. ' मरणांत खरोखर जग जगतें ' यासारख्या अपवादभूत कवितेंत

तसा प्रयत्न केल्यास तें शब्दांचें एक गौडबंगालच होतें. विरोधाभासमूलक किंवा त्या स्वरूपाचें गूढगुंजन ते लिहीत नाहीत. त्यांच्या कवितेंत ' पिंगा ' किंवा ' फुटकी तपेली ' आढळणार नाही.

तांबे हे खोल तत्त्वज्ञान सांगण्याच्या भानगडींत पडत नाहीत असें वर म्हटलें, त्याचाच एक भाग म्हणजे त्यांनी कोणत्याहि प्रकारचा संदेश सांगितलेला नाही. अर्वाचीन कवि म्हटला, की तो सामाजिक सुधारणेचा कट्टा पुरस्कर्ता, दुष्ट रूढींचा आत्यंतिक द्वेष्टा, सामाजिक विषमतेचा व अन्यायाचा कट्टा शत्रु, व राष्ट्रीय असल्यास वीररसपरिप्लुत भाषा लिहिणारा दुर्दम्य अभिमानी उपदेशक असावयाचा. तांबे यांना आधुनिक कवीविषयक या कल्पना फोल ठरविल्या आहेत. ते या गोष्टींस विरोधी होते असें नाही; पण या गोष्टी काव्याचा प्रत्यक्ष विषय आहेत व काव्यलेखन हें उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून व्हावयास हवें हें त्यांना मान्य नव्हतें. ते स्वतःस कलावादी म्हणवत; व त्यांचें काव्यविषयक वर्तन या त्यांच्या मतास धरून होई. त्यांच्या काव्यांत समाजाला अभिशाप, रूढीविरुद्ध चडफड, किंवा धर्म वा राजकीय सद्यःस्थिति यांवर लिहिलेलें प्रवचन आढळणार नाही. सामाजिक वा राजकीय अन्यायाविरुद्ध लिहिलेली एखादुसरीच व तीहि पूर्ववयांत लिहिलेली कविता आहे, नाही असें नाही; पण ती त्यांची खरी प्रातिनिधिक नव्हे. ' रणशिंग ' अथवा ' तुतारी ' वाजविण्याची कल्पना त्यांच्या मनांत येत नाही. राष्ट्रभक्तीचा संबळ वाजवून गोंधळ घालण्याची आवश्यकता त्यांना वाटली नाही. असें असूनहि ' रुद्रास आवाहन 'सारखी सामर्थ्य-शाली कविता ते लिहूं शकत. खरें म्हटलें म्हणजे आधुनिक कवींपैकी अनेक कवींना आपल्या जबाबदारीचें ओझें झालें होतें, तसें तांबे यांचें झालें नव्हतें. आपण कवि आहोंत, प्रेषित नव्हे याची ओळख त्यांना पक्की होती. केशवसुतांच्या ' तुतारी ' किंवा तत्सदृश इतर कविता यांच्यावर तांबे यांचा रोष होता तो याच कारणानें. तांबे यांच्या कवितेमधून विशिष्ट संदेश हुडकणाराची निराशा झाल्यावांचून राहणार नाही.

तांबे यांच्या कवितेंत प्रासंगिक कवितेचा जवळजवळ अभाव आहे याचें कारणहि प्रासंगिकापेक्षा शाश्वताबद्दलचें प्रेम हेंच म्हणावें लागेल. आपल्या

जीवनांतील किंवा आपल्या मित्रांच्या जीवनांतील प्रसंगाविषयीं जेव्हा त्यांनी लिहिलें, तेव्हाहि त्यास सर्वजनसुगम अशा रूपकाचा पेहराव देऊनच त्यांनी लिहिलें. ग्वाल्हेरची राजकुमारी व ग्वाल्हेर-नरेश यांच्या विवाह-प्रसंगीं लिहिलेल्या कविता या अपवादभूत आहेत, व त्याहि प्रामाणिक भावनेंतून निघाल्या आहेत असें वाटतें. राजकवि झाल्यावर त्यांनी फारसें काव्य लिहिलेंच नाही व त्याआधी राजप्रसादाकरिता म्हणूनहि कविता लिहिल्या नाहीत. आपल्या प्रतिभेचा उपयोग व्यावहारिक दृष्ट्या त्यांनी केला नाही ही गोष्ट आपल्या कवितेविषयी बेफिकीर असणाऱ्या कवीच्या स्वभावाशीं सुसंगत होती

केशवसुत व तांबे यांच्यामधील एक दुवा म्हणजे त्यांनी केलेली सुनीत-रचना ही होय. केशवसुतांनी सुनीत-रचना रूढ केल्यानंतरच तांबे यांनी सुनीतें लिहिलीं असल्याने एवढ्यापुरता तरी केशवसुतांचा पथ तांबे यांनी आक्रमिला असें म्हणतां येतें. तांब्यांचीं एकंदर बारा सुनीतें आहेत. त्यांपैकी पहिलीं नऊ प्रेमविषयक व उरलेलीं तीन इतर विषयांवरील आहेत. हीं कवीने बहुतेक वयाच्या पूर्वार्धातच लिहिलीं. सुनीतांमधील यमकरचनेचा विशिष्ट निर्बंध ते साक्षेपाने पाळतात; व सुनीत-रचनेच्या इतर स्थूल बाबीहि त्यांनी संभाळल्या असल्याने तीं टाकटिकीचीं झालीं आहेत. असें असूनहि त्यांचें एकहि सुनीत रसिकांच्या मुखांत जाऊन बसलेलें नाही. त्यांच्या ‘ गेली ज्योति विझोनिया ’ या सुनीताची प्रशंसा केशवसुतांनीसुद्धा केली; पण तांब्यांच्या चांगल्या चांगल्या कविता निवडण्याचा प्रसंग आला तर या सुनीतापेक्षा इतर कोणत्याहि सुनीताची निवड होत नाही. व याचीहि सुनीतांचें प्रातिनिधिक म्हणूनच होते. सुनीत-रचना खरोखर तांब्यांच्या खळखळणाऱ्या भावनापरिवाही प्रतिभेस अनुकूल नव्हती. तिला अधिक सुकर आणि गेय अशी गीतरचनाच अनुकूल होती हें तांबे यांनी लौकरच ओळखलें व १९२० नंतरच्या कालांत त्यांनी एकहि सुनीत लिहिलें नाही. तांब्यांच्या सुनीतांनी मराठी सुनीतरचनेस कदाचित् अधिक मान्यता मिळाली असेल, पण त्यांच्या इतर कवितांच्या मानाने त्यांत कृत्रिमता अधिक व भावना संकोचलेली अशी वाटते. तांब्यांनी सुनीतांचा नाद पुढे सोडला हें या दृष्टीने योग्यच ठरलें.

तांबे यांना जवळजवळ समकालीन असे दुसरे एक राजकवि, कवि चंद्रशेखर हे आपल्या रचनाविषयक कारागिरीकरिता प्रसिद्ध होते. ही कारागिरी तांबे यांनी संपादिली असती तर किती चांगलें झालें असतें ! पण तांब्यांची बेफिकिरी कवितानिर्मितीनंतर जशी तशी ती निर्माण करितांनाहि असे, असें म्हणाव लागतें. गीतस्वरूपाच्या कवितेंत यमकरचनेला साहजिकच महत्त्व येतें. पण स्थूल यमक-साधनेपलीकडे त्याकडे त्यांनी कारागिरीच्या दृष्टीने पाहिलेलें दिसत नाही. चोर-जोर यांबरोबर ' ढोर ' बसलेलें त्यांना चाले, किंवा भेसळ–अमंगल–केवळ अशीं यमकेंहि चालत. यमकांचें लोढणें त्यांनी अगदी झुगारून दिलें नाही, पण त्याचा बडिवारहि केला नाही हें काव्यार्थाच्या दृष्टीने इष्ट झालें असलें, तरी रचनेच्या कारागिरीच्या दृष्टीने विशेष स्पृहणीय नाही. तांब्यांची भाषा प्रवाही व शब्दयोजना अर्थवाही असली, तरी लालित्यपूर्ण असतेच असें नाही. त्यांनी योजलेलीं वृत्तें व जाति गेय असतील, परंतु जयदेव कवीच्या अनुकरणाने लिहिलेल्या कविता वगळल्यास माधुर्यपूर्ण अशी शब्दयोजना ते करितात असें दिसत नाही. ' घालोनि चटयांस । हे अल्पसंतुष्ट । स्वच्छंद तंबाखु । खातात पीतात; ' अशी रचना त्यांना चाले. शब्दमाधुर्याप्रमाणे अर्थमाधुर्याकडेहि ते कित्येक वेळा दुर्लक्ष करीत. ' बसा हात चोळुनि ', ' डोळे फाडा, तोण्डें वासा ', ' खेटर न मिळे ', ' हराम तरि मज जाण ' असे वाक्प्रयोग करण्यांत त्यांना संकोच वाटत नसे. वसंताला ते **कोतवाल** म्हणतात. बेपर्वा प्रियकरास **सांड** म्हणतात. कांही गद्य वाक्यें व कल्पना इतर चांगल्या कल्पना व शब्द यांबरोबर ते पेरून देतात. ' कारकून जावो हपिसाला ' यासारखें वाक्य त्यांच्या विषयदृष्ट्या गंभीर कवितेंत आलेलें पाहून हसूंच येतें. क्वचित् निष्ठुर, मधू, रुप, सुर ( सूर ), उडाण ( उड्डाण ) इत्यादि रूपदोषहि आढळतात. यापेक्षाहि कांही कवितांत दिसून येणारा संयमाभाव हा लालित्यास अधिक घातक वाटतो. ' ते कान्त ' या कवितेंत ' कुणि म्हणो ' या शब्दप्रयोगाची आवृत्ति फार वेळा झाली आहे. ' स्त्री हृदय-रहस्यां 'त, 'कां इथेच' या शब्दांसंबंधीं कांही प्रमाणांत तेंच झालें आहे. लहानलहान कवितांतून एकाच कल्पनेचा विस्तार फार झाल्यासारखा वाटतो. ' गाडी बदलली ' ही या प्रकारचें उत्तम उदाहरण आहे. जगांतील वसति ही आगगाडींत बसलेल्या

प्रवाशांच्या सहवासासारखी आहे एवढें म्हटल्याने खरोखर कार्य झालें असतें, पण तांब्यांचें समाधान तेवढ्याने होत नाही. कुशल प्रश्न झाले, परस्पर ओळख झाली, पीकपाण्याच्या व असहकारितेच्या गप्पा निघाल्या, डबे निघाले, फराळ झाले, चंची निघाली, विडे लागले; इतक्यांत जंक्शन आलें, गाड्या बदलण्याची घाई झाली इत्यादि तपशील त्यांत भरून मूळ कल्पनेंत असणारें काव्य तांबे यांनी बरेंच कमी केलें. ‘ जन पळभर म्हणतिल हाय हाय ’ या कवितेंतसुद्धा मी नसतांनाहि सारें पूर्ववत् सुरळित चालेल ही कल्पना फुलवितांना सूर्य, चंद्र, तारे, वारे, मेघ, शेतें, नद्या, सगेसोयरे इत्यादिकांचा उल्लेख करून ‘ डोळे पुसतिल, कामा लागतिल, उठतिल बसतिल, हसुनि खिदळतिल ’ इत्यादि क्रिया देऊन त्या कवितेंतील पांचां-पैकी तीन कडवीं अडविलीं आहेत. यांमध्ये निदान एक कडवें कमी होण्या-सारखें होतें. कोणत्याहि गोष्टीचें वर्णन करतांना तपशिलाचा भरणा करण्याचें तांब्यांना जणू व्यसनच होतं. त्यामुळे तेवढ्या प्रमाणांत नवीन अर्थ कमी सामावे. बहुधा विचार ध्रुवपदांतच सांगितला जाई; त्याचा विस्तार करण्याचें कार्य तेवढें पुढील कवितेंत शिल्लक उरे. रचनेच्या बाबतींत सर्व दृष्टींनी निर्दोष अशी कविता तांब्यांच्या संग्रहांत फार थोडी सापडेल. पण तिचे दोष बाह्यांगरचनेचे आहेत, मूळ कल्पनेचे नाहीत. चंद्रशेखर हे रचनेच्या बाबतींत काटेकोर व म्हणून क्लासिसिस्ट म्हटले, तर तांबे हे रोमँटिक असल्याने रचनेचा बडिवार न मानणारे असे झाले. एकाजवळ कसें सांगावें याचें कसब, तर दुसऱ्याजवळ सांगावयाच्या गोष्टी भरपूर. या दोघांचे हे गुण एकत्र येते तर निर्दोषसुंदर असें काव्य जन्माला येतें. महाराष्ट्रीय रसिकतेने कारागिरीपेक्षा कलेला, म्हणजे काव्याला मान अधिक दिला यांत मात्र शंका नाही.

तांबे यांनी मराठी कवितेकरिता काय केलें ? जाणीपूर्वक कांही नाही. केशवसुतांप्रमाणे ‘ नवीं काव्यें ’ लिहिण्याचा संकल्प त्यांनी सोडला नव्हता, किंवा इतर कित्येक आधुनिक कवींप्रमाणे ‘ कवि आणि त्याचें काव्य ’ याविषयीची चर्चा आपल्या कवितांमधून केली नाही. काव्यांत किंवा काव्याने क्रान्ति करण्याचा अभिनिवेश त्यांनी कधी बाळगिला नव्हता, किंवा कवीच्या किंवा काव्याच्या वतींन कांही अवास्तव अधिकारहि सांगितले

# अनुक्रम


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ कुस्करूं नका हीं सुमनें ! | १ |
| २ झरा | २ |
| ३ डोळे हे जुलमि गडे | ६ |
| ४ जगाहून भिन्न | ७ |
| ५ तुजवीण | ८ |
| ६ विधवेचें स्वप्न | ९ |
| ७ मार्गप्रतीक्षा | १० |
| ८ चिवचिव चिमणी | १३ |
| ९ पुंगीवाला | १४ |
| १० यापरी असे जीवन | ३६ |
| ११ ठावा न सुखाचा वारा | ३८ |
| १२ गुराख्याचें गाणें | ३८ |
| १३ कांतेस | ४० |
| १४ ती रम्या रजनी | ४१ |
| १५ संध्यातारक | ४३ |
| १६ घटोत्कच-माया | ४५ |
| १७ आशा, शब्द आणि दर्शन | ४७ |
| १८ सत्प्रीतिमार्ग | ४८ |
| १९ वदन मदनरंगसदन | ४९ |
| २० कां रे जाशी मज त्यजुनी ! | ५० |
| २१ तीनी सांजा सखे, मिळाल्या | ५१ |
| २२ बुल्बुलास | ५२ |
| २३ हृदय सांग चोरिलें कशास सुंदरी ? | ५३ |
| २४ तूं जिवलगे विद्यावती जाणती | ५४ |
| २५ तारुण्यांतील एक प्रसंग | ५५ |
| २६ चिरंजीव कोण ? | ५८ |
| २७ बिजली जशि चमके स्वारी ! | ६१ |
| २८ प्रेममाहात्म्य | ६२ |
| २९ हिमाच्छन्न सरिता | ६३ |
| ३० मुशाफिर आम्ही | ६४ |
| ३१ सान्त्वन | ६६ |
| ३२ ये पहाटच्या वर तारा | ७२ |
| ३३ प्रीतीचा वास | ७३ |
| ३४ सखये, या स्थानीं — | ७४ |
| ३५ दुष्काळानंतरचा सुकाळ | ७६ |
| ३६ चौघडा झडतो | ७८ |
| ३७ हा आणि तो | ७९ |
| ३८ कुपित अंगनेप्रत | ८१ |
| ३९ संदिग्ध ताना | ८२ |
| ४० कळ्याकळ्यांत विहार | ८३ |
| ४१ क्रुद्ध सुंदरीस | ८३ |
| ४२ शैशवदिन जरि गेले निघुनी | ८५ |
| ४३ अजुनि लागलेंचि दार— | ८६ |
| ४४ पाडवा | ८७ |
| ४५ वियोगिनी | ८९ |
| ४६ सृष्टिशिक्षण | ९२ |
| ४७ प्रणयवंचिताचे उद्गार | ९३ |
| ४८ आठवती ते दिन अजुनी | ९४ |
| ४९ कालाच्या चढुनी श्रमें— | ९५ |
| ५० ललने, चल चलुं लवलाही ! | ९६ |
| ५१ गेली ज्योति विझोनिया | ९८ |

| नांव | पृष्ठ |
|---|---|
| ५२ शुक्राची चांदणी | ९९ |
| ५३ राजकन्या आणि तिची दासी | ९९ |
| ५४ आनंदी आनंद ! | १०१ |
| ५५ क्षिप्रा—चमळासंगम | १०३ |
| ५६ हें कोण गे आई ? | १०४ |
| ५७ रासमंडळ गोपीचंदन— | १०५ |
| ५८ आईकडे न्या ! | १०७ |
| ५९ तर मग गट्टी कोणाशीं ? | १०८ |
| ६० शिशुवंचन | १०९ |
| ६१ गतकाल | ११३ |
| ६२ अंधारांतून डोकावणारीं मुखें | ११४ |
| ६३ काळेभोर विशाल केस | ११५ |
| ६४ पन्नास वर्षांनंतर | ११६ |
| ६५ निःशब्द आत्मयज्ञ | ११७ |
| ६६ मातृभूमीप्रत | ११९ |
| ६७ आलें तुझ्या रे दारीं नृपा | १२० |
| ६८ रे चेटक्या ! | १२१ |
| ६९ प्रभु,तुज कवणेपरि ध्याऊं? | १२२ |
| ७० रे मानसहंसा ! | १२४ |
| ७१ अनंत—स्तोत्र | १२६ |
| ७२ सामाजिक पाश | १२७ |
| ७३ कोठे शान्ति, तुझा निवास? | १२८ |
| ७४ शान्तिनिवास | १२९ |
| ७५ चल जळो ज्ञानविज्ञान गड्या ! | १३३ |
| ७६ जीवनसंयोग | १३५ |
| ७७ प्रणयप्रभा | १३६ |
| ७८ कुणि कोडें माझें उकलिल का ? | १३७ |
| ७९ जीवनसंगीत | १३८ |
| ८० मग विसर हवा तर हा क्षण गे ! | १३९ |
| ८१ लोकमान्यांस | १४० |
| ८२ घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी | १४२ |
| ८३ बघुनि तया मज होय कसेंसें ! | १४३ |
| ८४ गौप्यगोपन | १४५ |
| ८५ भयचकित नमावें तुज रमणी ! | १४६ |
| ८६ प्रेमरत्नास | १४७ |
| ८७ तें दूध तुझ्या त्या घटांतलें | १४८ |
| ८८ नववधू प्रिया, मी | १४९ |
| ८९ पावलोपावलीं साउलि ही ! | १५० |
| ९० क्षण सुवर्णकण झाले रमणा ! | १५१ |
| ९१ घन तमीं शुक्र बघ राज्य करी ! | १५२ |
| ९२ सोन्याची घेउनि करिं झारी | १५३ |
| ९३ आव्हानशृंग | १५४ |
| ९४ मंदिरीं मना, तव गान भरे | १५५ |
| ९५ या प्रकाशशिखरीं | १५६ |
| ९६ रे अजात अज्ञात सखे जन ! | १५७ |
| ९७ गोंधळाचें वर | १५८ |

| नांव | पृष्ठ |
|---|---|
| ९८ या वेळीं माझ्या ये रमणा ! | १५९ |
| ९९ गे शपथ तुझी ! | १६० |
| १०० नटेश्वराची आरती | १६१ |
| १०१ घातली एकदा अता उडी ! | १६२ |
| १०२ रुद्रास आवाहन | १६३ |
| १०३ उद्याची गति | १६४ |
| १०४ पोशाख नवनवा मला दिला | १६६ |
| १०५ महा-प्रस्थान | १६७ |
| १०६ घाबरूं नको, वावरूं नको ! | १६८ |
| १०७ आलों, थांबव शिंग ! | १६९ |
| १०८ जन पळभर म्हणतिल, 'हाय हाय !' | १७० |
| १०९ निरोप घेतांना | १७२ |
| ११० मरणांत खरोखर जग जगतें ! | १७३ |
| १११ उदार चंद्रा ! | १७५ |
| ११२ गाडी बदलली ! | १७६ |
| ११३ किति महामूर्ख तूं शहाजहां ! | १७७ |
| ११४ जीवितसाफल्य | १७८ |
| ११५ आज तो कुठे जिवाचा चोर ? | १७९ |
| ११६ स्वारी कशी येईल ? | १७९ |
| ११७ वैरिण झाली नदी ! | १८१ |
| ११८ निजल्या तान्ह्यावरी | १८१ |
| ११९ कळा ज्या लागल्या जीवा | १८२ |
| १२० जन म्हणति सावळी ! | १८३ |
| १२१ फेरीवाला | १८४ |
| १२२ पक्षि पिंजऱ्यांतुनी उडला ! | १८५ |
| १२३ दृष्ट हिला लागली ! | १८७ |
| १२४ विरहांतील चित्तरंजन | १८८ |
| १२५ तुझे लोचन | १९० |
| १२६ घट भरा शिगोशिग | १९१ |
| १२७ निष्ठुर किति पुरुषांची जात ! | १९२ |
| १२८ घट तिचा रिकामा-- | १९२ |
| १२९ पुनवेची शारद रात | १९४ |
| १३० कवणे मुलखा जाशी ? | १९५ |
| १३१ रतलें परपुरुषाशीं | १९५ |
| १३२ हिंदु विधवेचें मन | १९६ |
| १३३ दे पूर्ण हृदय सुंदरी | १९८ |
| १३४ उखळांत दिलें शिर ! काय अता ! | १९९ |
| १३५ दरडीवरील बाला | २०० |
| १३६ अंगाईगीत | २०१ |
| १३७ मिळे गे नयना नयन जरी | २०२ |
| १३८ समजुनि बांध शिदोरी | २०३ |
| १३९ अशांचें कोण करिल तरि काय ? | २०३ |
| १४० कोण रोधील ? | २०४ |
| १४१ प्रतिज्ञा | २०५ |

| नांव | पृष्ठ |
|---|---|
| १४२ वसंत फेरीवाला | २०६ |
| १४३ जेव्हा लोचन हे | २०६ |
| १४४ तू कवण जगांतिल ललना ? | २०७ |
| १४५ रुणुझुणु ये ! | २०८ |
| १४६ समज मानिनी ! | २०९ |
| १४७ उडाला हंस ! | २०९ |
| १४८ नदितिरीं उभी ती | २१० |
| १४९ ते कान्त यापुढे ! | २१३ |
| १५० पहा हो कसा हा कारागीर ! | २१५ |
| १५१ वाटलें नाथ हो ! | २१६ |
| १५२ सहज तुझी हालचाल | २१७ |
| १५३ केवळ सुखराशी ! | २१८ |
| १५४ तृणाचें पातें | २१८ |
| १५५ राजद्रोह की देशद्रोह ? | २१९ |
| १५६ स्त्रीहृदयरहस्य | २२१ |
| १५७ सरस्वती-स्तोत्र | २२५ |
| १५८ निशिदिनिं तुज हरि, ध्याइन का मी ? | २२८ |
| १५९ चरणिं तुझ्या मज देईं रे वास हरी ! | २२८ |
| १६० चरण कधी का पाहिन आई ? | २२९ |
| १६१ वंदन व्हावें हरि, मम जीवित | २३० |
| १६२ हरि, अर्पावें काय तुला मीं ? | २३० |
| १६३ कलेचें हृद्गत | २३१ |
| १६४ म्हाताऱ्या नवरदेवाची तक्रार | २३२ |
| १६५ जय वाल्मीकी ! | २३३ |
| १६६ साम्राज्यवादी | २३४ |
| १६७ कोणिकडे जादुगारिणि ? | २३५ |
| १६८ अर्जी ऐका हो सरकार ! | २३५ |
| १६९ कशि लाज सोडिशी सारी ? | २३६ |
| १७० भोग कुणा सुटले ? | २३६ |
| १७१ सखि आली ! | २३७ |
| १७२ झाशीवाली | २३८ |
| १७३ रिकामे मधुघट | २३९ |
| १७४ हांक | २४० |
| १७५ स्त्रीला नमस्कार हा ! | २४१ |
| १७६ भैरव | २४२ |
| १७७ एक आकांक्षा | २४३ |
| १७८ वधूवरयोः शुभं भवतु ! | २४४ |
| १७९ अवमानिता | २४५ |
| १८० कां उभी तूं तरी ? | २४६ |
| १८१ फसवणूक | २४६ |
| १८२ अहो धन्वंतरी | २४७ |
| १८३ माळीण | २४८ |
| १८४ गति कशी व्हावी ? | २४८ |
| १८५ स्फुट ओव्या | २४९ |
| १८६ जोगी | २५० |
| १८७ माहेरची आठवण | २५१ |
| १८८ माझ्या अंगणांत | २५२ |

| नांव | पृष्ठ |
|---|---|
| १८९ लाजूं नको ताई ! | २५३ |
| १९० वाटेच्या वाटसरा ! | २५४ |
| १९१ आज फिरुनि कां दारिं ? | २५५ |
| १९२ ये पहाटच्या तारा गगनीं | २५७ |
| १९३ प्रिया हेंच सर्वस्व ! | २५८ |
| १९४ कुणि असेल ग ! | २५९ |
| १९५ दिव्यांगनेची ओढ | २६० |
| १९६ पूर्णाहुति | २६१ |
| १९७ दुर्गा | २६२ |
| १९८ चरणाखालिल हाय मीच रज ! | २६३ |
| १९९ कवनकमळें | २६४ |
| २०० मेनकावतरण | २६४ |
| २०१ जय रतिपतिवर ! | २६५ |
| २०२ शरणागत | २६६ |
| २०३ चुकला बाण | २६६ |
| २०४ मावळत्या सूर्याप्रत | २६७ |
| २०५ घर राहिलें दूर ! | २६८ |
| २०६ पाणपोईवाली | २६८ |
| २०७ वारुणीस्तोत्र | २६९ |
| २०८ जमादार | २७० |
| २०९ ग्रीष्म | २७१ |
| २१० विरहांतील जीवन | २७२ |
| २११ आज पारणें कां फिटलें ? | २७२ |
| २१२ चौकीदार | २७३ |
| २१३ तें कोण या ठायिं ? | २७४ |
| २१४ वायो, खुणव तीस | २७५ |
| २१५ संगीत कलेप्रत | २७६ |
| २१६ तरुणांस संदेश ! | २७७ |
| २१७ शुभं भूयात् | २७८ |
| २१८ कोठे मुली जासि ? | २७९ |
| २१९ पुनः पुनः यावें | २८० |
| २२० तुझे चरण पाहिले | २८१ |
| २२१ ॐ तत्सत् | २८२ |
| २२२ राधा झूलत माधवसंग | २८३ |
| २२३ अब तुम जयजयकार करो | २८३ |
| २२४ बिनती सुनो आज | २८४ |
| २२५ शारदास्तोत्र | २८५ |

काव्यारंभांची सूचि ... ... ... २८७

टीपा ... ... ... २९१

परिशिष्ट ... ... ... ३०५

## १६. घटोत्कच-माया

[ जाति युवतिभूषण ]

घटोत्कच-माया पसरली   पसरली हिंददेशीं या   ध्रु०

" जुनें जुनें तें सर्वहि द्या द्या,
नवें नवें तें पाहुनि ध्या ध्या,
आलें दुरुनी चालुनि बुद्धया
तुम्हां सुखवाया   निरभिलाष झिजवी काया   १

जुनें जुनें तें सर्वहि द्या द्या,
द्या द्या कुजक्या गिर्द्या, गाद्या;
काढा कचरा, सान्या चिंध्या;
कागद ध्या, या   तुळतुळित साफ पाहुनिया   २

हाडें आणिक कातडिं द्या द्या,
चाकू, बटन, फण्या हीं ध्या ध्या !
जिनें, पाकिटें, बूटहि, वाद्या,
किती सुंदर या   झकझकीत वस्तू सान्या !   ३

कापुस, लोकर यांचे भारे
काढा देशांतुनिया सारे,
द्या द्या आणा हें पोतेरें,
तनू सजवाया   शेले अणि शाल्र ध्या या.   ४

वस्त्रें देशी जाडीं भरडीं
जैशी बुरडाघरची परडी,
रुतती कांट्यांपरि अति हाडीं.
शिणवितां वाया   कां सुंदर कोमल काया ?   ५

## ७३. कोठे शान्ति, तुझा निवास ?

[ सुनीत, वृत्त शार्दूलविक्रीडित ]

कोठे शान्ति, तुझा निवास ? वसशी तूं प्रीति, कोठे ? सुखा,
कोठे मंगल धाम रे तव ? धरा कीं स्वर्ग पाताळ कीं ?
लोकीं अन्य निवास का ? पडतसे छायाच येथे निकी,
ताऱ्यांचा पडतो प्रकाश धरणीभागीं तसें हेंहि का ?

विद्युद्दीप, हिरे, विमान, अथवा तारा, सिनेमान्तरीं
किंवा कांचन—कामिनींत वसतां ? तारुण्य बाल्यांत कीं ?
देव्हाऱ्यांत मनाचिया पहुडतां गंभीर निद्रासुखीं ?
धुंडूं मी कवणे स्थळीं ? कुणि सखा दावील का हो तरी ?

किंवा केवळ अर्थशून्य असती हे शब्दची पोकळ
जैसें सुंदर नील हें नभ दिसे अस्तित्व नाही परी ?
शोधूं जा तरि दूर दूर पळती हीं चक्रवाकापरी
किंवा ही मृगतृष्णिका फसविते भोळ्या जनां केवळ ?

चाले नित्य अकांडतांडव इथे शोधार्थ यांच्या फुका,
देवा, तूं निजलास का ? तुज दयामाया मुळीं नाहि का ?

प्रतापगढ, ता. ४ मार्च १९२० ]

# काव्यारंभांची सूचि

[ आकडे पृष्ठांकांचे आहेत. ]


अगाध निर्मळ अपार सुंदर २३१
अगाध दुर्मिळ जनीं दिसे मज १९०
अजि पुनवेची शारद रात ...१९४
अजुनि लागलेंचि दार ... ८६
अता राहुं देई नाम ...२७६
अनंता, तुझे गोल, तारे तुझे, १२६
अब तुम जयजयकार करो ! १८३
अरुणनयन ...२३७
अर्जी ऐका हो सरकार ...२३५
अशांचें कोण करिल तरि काय ? २०३
अस्ताचलीं सूर्य, ...२७३
आज तो कुठे जिवाचा चोर ? १७९
आज फिरुनि कां दारिं उगवलां?२५५
आज नृपराज ये ...२७८
आठवती ते दिन अजुनी ... ९४
आनंदी आनंद मुलांनो ...१०१
आरती त्रिभुवन-जनकाची ...१६१
आला हाऽऽ दारिं उभा वसंत २०६
आलें तुझ्या रे दारीं नृपा ...१२०
आलि आलि दीप्तिशालि ...२६४
आलिस काय खिडकींतून ...२६६
आलों, थांबव शिंग दूता ! ...१६९
आव्हानशृंग तव तीव्र कसें ...१५४
उखळांत दिलें शिर काय अता ?१९९
उगवे निशाकान्त ...२७९
उगिच कशाला पाहशि ...२४६
उगिच काय बुल्बुलाऽ, ... ५२
उदार चंद्रा, तुला नमुनि मी १७५
उद्यांची काय कळे रे गती ?...१६४
उरला दिवस अल्प ...२६८
कडकड कडकड तडित् ... ४८
कधी भेटतां एकान्तीं ती ...११७
कवणे मुलुखा जाशी गे तूं ? १९५
कशि लाज सोडिशी सारी ...२३३
कशि काळनागिणी वैरिण ...१८१
कळा ज्या लागल्या जीवा ...१८२
कळ्या-कळ्यांत विहार . ८६
कां मज आज तुम्हीं बोलविलें ? २४५
कां रे जाशी मज त्यजुनी ?... ५०
कांते, या जगतीं जरी मिरविती ४०
काय जमादार तुझा ...२७०
कालाच्या चढुनी श्रमें वरिवरी ९५
काळेभोर विशाळ केस रुळती ११५
किति फुगशि फुलशि ...२७२
किति महामूर्ख तूं शहाजहां ! १७७
“ किति हृदय ओढिती हरिण! ” ९२
कुणास ठाउक कवणे रूपी ...१७९
कुणि असेल ग ...२५९
कुणि कसें म्हणा, कुणि ...२१३
कुणि कोडें माझें ...१३७
कुरणावरती बडाखालती ... ३८
कुस्करूं नका हीं सुमनें ! ... १

कृष्ण वस्त्र हें भयद घेउनी ... १०
केवि सरे रजनी ! ...२७२
कोठे शान्ति, तुझा निवास ? ...१२८
कोणिकडे जादुगारिणि ...२३५
कोवळीं फुलें वाळलीं ...१०७
क्षण सुवर्णकण झाले रमणा, ...१५१
गहन विपिनिं करि गौरि ...२३२
गेली ज्योति विझोनिया मग ... ९८
गे शपथ तुझी, मी वदें खरें ...१६०
घट तिचा रिकामा झऱ्यावरी १९२
घट भरा शिगोशिग ! भरा भरा १९१
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी ...१४२
घटोत्कच-माया पसरली ... ४५
घन तमीं शुक्र बघ ...१५२
घन पिता मम जो नटवी धरा २
घातली एकदा अता उडी ...१६२
घाबरूं नको, बावरूं नको ! ...१६८
घुमव घुमव एकदा फिरुनि तो ७६
घेतला जोग ...२५०
चंद्राच्या गालावरी ...२५१
चंद्राच्या दांत पटांमधुनी ...१४५
चंद्राने गगना पयोधवल्शा ... ४१
चरण कधीं का पाहिन आई ? २२९
चरणिं तुझ्या मज देईं रे ...२२८
चल जळो ज्ञानविज्ञान गड्या, १३३
चहुकडे ढगांच्या माळा ...२००
चिवचिव चिमणी छतांत ... १३
चौघडा झडतो ... ७८
छेड सखे, ...२६२
जगाच्या बागेंत ...१७२
जन खुळे म्हणति तर ...१३५
जन पळभर म्हणतिल 'हायहाय' १७०
जन म्हणति सावळी तुज ...१८३
जन्मा येउनिया कुशीं तव ...११९
जय जय जननी देवि ! ...२२५
जयतु जय भगवती ! ...२६९
जय वाल्मीकी ! ..२३३
जय शारदादेवि ! ...२८५
जाउनी तिला येथुनी दिवस १०९
जागवी जरी सुकुमारी, ... ७२
जिवलगे, संगिं मम सारा ... ३८
जिवाचे लागेबांधे ...२५४
जीवनाध्वरिं पडे आज पूर्णाहुती २६१
जेव्हा लोचन हे तुझे विहरती २०६
जेव्हा हो अति तीव्र शीत, ... ६३
जो जो जो जो रे ! ...२०१
ज्योत्स्नेने नभ व्यापिलें, ... ७
झाली ती ओणवी ...२६८
झाले जे कवि, वंद्य त्यां जन ... ६२
झोपाळ्यावर बसूं .. २४९
डुमडुमत डमरु ये ...१६३
डोळे हे जुलमि गडे, ... ६
तरुणा, जिवा अंत ...२६०
तव नयनिं उजळले बाल-रवी १३६
तीनी सांजा सखे, मिळाल्या, ५१
तुज खेळ वाटली प्रीति मना रे ९३
तुझ्या गळां ...१०८
तुम्हि असें समजतां, गुपित न २२१

तुम्हीं न यावें हो धन्वंतरि, २४७
तुला न देइन माला ...२४८
तूं कवण जगांतिल ललना ...२०७
तूं ये गे, ये गे, ये, ये ...२४०
तूं हुबेहूब साउली त्याच मूर्तिची ११६
तृणाचें पातें ...२१८
तेची चिरंजीव जगीं जहाले... ५८
तें दूध तुझ्या त्या घटांतलें ...१४८
त्या दारावरुनी कोण निघे?...१५८
त्वेषाने घनघोर घर्घररवें ... ८२
थांब जराशी ...२१८
दारिं उभा शरणागत ...२६६
दिनान्तीं श्रमान्तीं ...२४६
दुनियेच्या भरल्या बाजारीं...२५८
दुंदुभी दुमदुमे भारी ... ६१
दृष्ट हिला लागली, पडे कुणा...१८७
दोशि मला तूं जरी तरी दे ...१९८
दैत्यशी छातिवर, ठेली ...१६७
धन्य झालों देवा ...२८०
धुळीलाहि जाऊं मिळोनी सुखें २०५
नगर सुंदर एक महेश्वर ... १४
नटवर तो हर ध्यावा ...२४२
नदितिरीं उभी ती दाट तृणीं २१०
नदीच्या शेजारीं ...१०४
नववधू प्रिया, मी बावरतें,...१४९
नादीं लागुनि तुझ्या चेटक्या...१२१
नाही ज्या सुमनीं मधू ... ५४
निजल्या तान्ह्यावरी माउली...१८१
नितान्त झाली शान्त निशा ही १२९
निर्जनीं घोर या वनीं कोण तूं... ८९
निशिदिनिं तुज हरि,ध्याइन...२२८
निष्ठुर किति पुरुषांची जात ...१९२
पक्षि पिंजऱ्यांतुनी उडाला ...१८५
पंजरीं पाखरूं फडफडतें ...१५७
पहा हो कसा हा कारागीर...२१५
पाडवा उगवला नवा पुन्हा... ८७
पातालांतूनि येतां वरवर गगनीं ४७
पावलोपावलीं साउलि ही ...१५०
पोशाख नवनवा मला दिला...१६६
प्रभु तुज कवणेपरि ध्याऊं ?...१२२
प्रवाहपतिता काष्ठांसम हो ...१७६
प्रीति ना वसे कधीहि ... ७३
प्रेम तयावर होतं तर मग तुमचं ९९
प्रेमोत्कर्षे मनें परस्पर जयीं...१२७
फस्त करी भक्षुनिया ...२३४
फेऱ्या दारावरी कुणी हा ...१८४
बघुनि तया मज होय कसेंसें ...१४३
बिनती सुनो आज ...२८४
भयचकित नमावें तुज रमणी...१४६
भाग्य उजळलें ...२८१
भोग कुणा सुटले जगिं या ...२३६
भोळा शंभु दिसे वरी ...२४१
मग विसर हवा तर हा क्षण गे !१३९
मधु मागशि माझ्या सख्या...२३९
मधुमासामधि बहार येतो ... ५५
मध्यरात्रिच्या निवान्त समयीं रे ११३
मंदिरीं मना तव गान भरे ...१५५
मरणांत खरोखर जग जगतें...१७३

माझे बांधुनि हातपाय ...२४८
माझ्या अंगणांत ...२५२
माझ्या दारावरनं ...२५३
मावळत्या दिनकरा, ...२६७
मिळे गे नयनां नयन जरी...२०२
मी चालतां वाट ...२७४
मुशाफिर आम्ही ... ६४
या क्षिप्राचमळा परस्पर कशा १०३
यापरी असे जीवनऽसखे गे, ३६
या पाप्याच्या पायांसाठी २१९
या प्रकाश-शिखरीं कुणिकडुनी १५६
या भविष्याचिया दिव्य ...२०४
या वेळीं माझ्या ये रमणा...१५९
येतां तुझ्या दारिं मी ...२७५
ये ना हंस उडाला हाता ...२०९
ये पहाटच्या तारा गगनीं ...२५७
योग हा वधुवरां ...२४४
रतलें परपुरुषाशीं रे, मी ...१९५
रवी जातां जातांच मंदिरातें ४३
राजराजेश्वरा हो दयाळा !...१४०
रात्रीं शान्त निवान्त विश्व वश ११४
राधा झूलत माधवसंग ...२८३
राऽसमंडल गोपीचंदन ...१०५
रुणुझुणु ये, रुणुझुणु ये ...२०८
रे मानसहंसा माझ्या ...१२४
रे हिंदबांधवा, थांब या स्थळीं २३८
रे हिन्या माझिया झळक घरीं १४७
ललितलताकुंजीं स्मरमंजरि, ९६
वदन मदनरंगसदन ...४९
वन्दन व्हावें हरि, मम जीवित २३०
वाटलें नाथ हो, तुम्ही उतरतां २१६
विमल या कलिका लतिकांवरी ६६
विरहीं मी बहुपरी मनोमय चित्रें १८८
वेणूंत नादसम नित्य सखे, ८
शुक्राची मधु चांदणी लखलखे ९९
शैशव दिन जरि गेले निघुनी ८५
संसार-सतारीवरि तारा ...१३८
सखये, या स्थानींऽवसावें वाटे ७४
सखिलोचनकासारीं ...२६४
सखे, अगे ऊठ ! रवी उदेला ९
सजलीस जरी हें हृदय सखे, ८३
समज मानिनी, मान न करिं गे २०९
ससर्ज यो विश्वमनन्तमेतत् २८२
सहचरि, समजुनि बांध शिदोरी २०३
सहज तुझी हाल-चाल ...२१७
सांगु कुणा गुज ...२६३
सांगु तुम्हांला किती दयाळा ? १९६
सुरासुरांचा चुरा ...२६५
स्वारि बाइ केवि आलि !...२७१
सुफलित झालें गे सखि जीवित ! १७८
सोन्याची घेउनि करिं झारी १५३
हरि, अर्पावें काय तुला मीं ? २३०
हळु हळु हळु वर वर नभिं २४३
हातास ये जें, ...२७७
हा श्रीविलासांत सदैव लोळे, ७९
हृदय सांग चोरिलें कशास ५३
हे मुरड नेत्र रागांत किं ...८१

१६६. धान्यराशि–धान्याचे ढीग; अनुस्वार अर्थातच चुकून पडला आहे. साम्राज्यवाद्याचें लढणें, कळवळा, शान्तीच्या गप्पा, न्यायाचा आव, विश्वबंधुता, निरिच्छता व धार्मिकता सर्व खोटी !

१६८. जगांतील वैषम्याचें मंडन कसें करावयाचें हें कवीला तरी समजत नाही.

१६९. रविराजाच्याहि नजरेस पडूं नये म्हणून मी जें जें लपवितें त्याचा तूं चारचौघांत निःसंकोच उच्चार करतोस. हें कसें बरें तूं करतोस ?

१७१. अरुणोपम, विमलहृदय व प्रस्फुटयौवन तरुणीला उद्देशून.

१७२. झांशीच्या राणीचें स्मारक ग्वाल्हेरचे किल्ल्याखाली बांधलें आहे. त्यावर खोदण्यासाठी प्रस्तुत कविता रचली.

१७३. आपल्या प्रतिभेचा दीप आता म्लान होतो आहे असें कवीसच वाटतां वाटतां किती तरी प्रकाश त्याने पाजळला आहे.

१७४. परमेश्वरी कृपेला ही हांक मारली असावी असें वाटतें.

१७५. स्त्रिया अबला नसून प्रबला आहेत.

१७७. सुनेरि ( हिं. )–सोनेरी.

१७८. ग्वाल्हेरच्या राजकुमारीचे विवाहप्रसंगीं ही कविता लिहिली होती.

१८१. लुसलुसलें–टवटवीत, तजेलदार. दिवाणें-वेडें. मंजरी–मोहर, तुरा.

१८२. ‘ सरें ’च्या ऐवजीं ‘ सरे ’ असें पाहिजे.

१८३. तिसऱ्या ओळीचे आरंभीं अवतरणचिन्ह चुकून पडलें आहे. इतका अवखळ शृंगार तांबे यांच्या कवितेंत अन्यत्र नाही. वेला–बेलिया, मोगऱ्याचा एक प्रकार, चमेली.

१८४. हे कान्त, अफाट संसारांत अरक्षित अशी मला एकटीला टाकून दिलीत व या बुरसटलेल्या विचारांच्या लोकांचाही जर तुझ्याविरुद्ध अपवाद उठला तर तूं मला जन्माची मुकशील अशी वरतीं धमकी देतां. अशा भीषण परिस्थितींत माझी कशी धडगत लागणार कुणास ठाऊक !

१८६. कवणपाशीं–कुणाच्या पाशांत सांपडून. जोग-संन्यास.

१८८. खंत–हुरहूर. प्याले–पेले.

१९०. बाळपणीं शब्द दिला असला तरी प्रौढपणीं विपरीत प्रसंगाने अन्य ठिकाणीं संसार करीत असलेली ही स्त्री बाळपणच्या संवगड्यास

# कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांची प्रस्तावना

## ( पहिली आवृत्ति )

कविवर्य भास्कर रामचन्द्र ताम्बे यांचा जन्म ग्वाल्हेर संस्थानांत मुगावली येथे ख्रिस्तशके १८७४ या वर्षी कार्तिक वद्य षष्ठीस झाला. त्यांच्या कौमारकालांतच त्यांचे वडील वारले. परंतु त्यांचे मामा बळवन्तराव डोंगरे आणि गुरुजी काशीनाथपन्त लेले यांच्या सक्रिय सहानुभूतीमुळे ताम्बे हे १८९३ मध्ये अलाहाबाद विश्वविद्यालयाची प्रवेश-परीक्षा उतरून पहिल्या वर्गांत आले. त्यांचे वडील बन्धु गोपाळराव हे त्या वेळीं बी. ए.च्या वर्गांत होते. त्यांना शिक्षण पुढे चालवितां यावें म्हणून भास्कररावांना आपलें शिक्षण थाम्बवावें लागलें. याच वर्षी काशीनाथपन्त लेले भास्कररावांना घेऊन महाराष्ट्रांत आले आणि त्यांनी त्यांना मुम्बई, पुणें आणि इतर कांही स्थळें दाखविलीं. भास्कररावांचा विवाह १८९६ मध्ये रतलाम येथील त्र्यम्बकराव जावडेकर यांची मुलगी वारूबाई हिच्याशीं झाला. ती त्यांना ‘ रम्याकृतींची अधिदेवता ’च भेटली; आणि त्या सौभाग्यवतीने पतीचें जीवित खरोखरीच ‘ सुफलित ’ करून टाकिलें आहे. भास्कररावांना लहानपणापासूनच कविता रचण्याचा नाद असे. काशीनाथपन्त लेले यांनी आपल्या शिष्याची कवित्वशक्ति ओळखून तिच्या जोपासनेसाठी शक्य ते परिश्रम घेतले, आणि ताम्बे हे महाराष्ट्रांत अग्रेसर कवि म्हणून प्रसिद्ध झालेले पहावयाला ते गुणज्ञ आणि वत्सल गुरुजी राहिले हें सुदैव होय. पुढे भास्कररावांनी निरनिराळ्या ठिकाणीं मोठमोठ्या पदांवर कामें केलीं. या त्यांच्या आयुष्यांत त्यांचीं अनेक स्थित्यन्तरें झालीं, आणि आता ते ग्वाल्हेर येथे शिक्षण-खात्यांतून सेवानिवृत्त होऊन राजकवि म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. कचेरीच्या कामामुळे काव्याकडे लक्ष द्यायला त्यांना रिकामा वेळ मिळत नव्हता; आणि पूर्वी लिहिलेल्या कवितांपैकी कित्येक गहाळ झाल्या होत्या, अशा स्थितींत १९१७–१८ मध्ये महाराष्ट्रांतून, पुण्यांतून त्यांच्या कवितांची विचारपूस झाली. प्रो० मायदेव यांनी चिकाटीने परिश्रम करून ताम्बे यांच्या कविता ठिकठिकाणांहून मिळवून १९२० च्या डिसेम्बर

मासांत त्या प्रकाशित केल्या; आणि नावीन्याचा नादी ग्राहक असा जो विद्यार्थिवर्ग, त्या वर्गापुढे आपल्या गोड स्वराने त्या म्हणूनहि दाखविल्या. याच्या थोडें आधी भास्कररावांच्या घरीं चोरी होऊन इतक्या वर्षांच्या कष्ट-श्रमाने जी थोडीफार पुञ्जी त्यांनी मिळविली होती ती सारी चोरीस गेली. सुवर्णधनाची हानि यशोधनाने भरून निघत नाही, पण आता त्यांना भराभर प्रसिद्धि मिळूं लागली; आणि या वेळीं त्यांच्या काव्यलतेलाहि नवीन भर येऊं लागला.* १९२६ च्या नाताळांत इन्दूर येथे भरलेल्या मध्यभारतीय

---

* ता० २४ सप्टेम्बर १९२० या दिवशीं प्रो० मायदेव यांना लिहिलेल्या पत्रांत ताम्बे म्हणतात, "कशी कोणास ठाऊक पण गेल्या कांही दिवसांत माझी कविता एकाएकी जागृत झाली आहे. एक शम्भर कविता प्रतिदिवशीं माझ्या मनांत उद्भवतात आणि तितक्या कशा तरी निःशब्दपणें अन्तर्हित होतात. कांही अगदी थोड्याच शब्दरूपाने व्यक्त होतात! श्रेष्ठ कविता या गम्भीरतम दुक्खाप्रमाणे निःशब्द असतात असें जें म्हटलें आहे, तें खरें आहे."

[I do'nt know how, but the Muse has suddenly been awake during the last few days, and a hundred poems rise up in my mind every day and a hundred are hushed up any how; only a few become expressed in words! It is truly said, "The greatest poems are silent, silent as deepest grief."]

ता० १० ऑक्टोबर १९२० ला प्रतापगढाहून प्रो० मायदेव यांना लिहिलेल्या पत्रांत ताम्बे म्हणतात, "या अलीकडील कविता (जन खुळें०, प्रणयप्रभा इत्यादि) या माझ्या सर्व लिखाणांत मताने परिपक्व, विचाराने गम्भीर, भावनेने उत्कृष्ट आणि कलादृष्ट्या उदात्त आहेत असें मला वाटतें."
["But I think these laterday poems (जन खुळें०, प्रणयप्रभा etc.) are the ripest in judgment, deepest in thought, intensest in feeling and noblest in art, in all my writings."]

मराठी कविसम्मेलनाचें अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें. १९२७ मध्ये त्यांच्या नवीन कवितांचा भाग श्री० दि. गं. केळकर यांनी प्रकाशित केला, परन्तु प्रकाशनानन्तरचें कार्य राहून गेल्यामुळे हा भाग उत्कृष्ट असूनहि याचा बोलबाला झाला नाही. तथापि याच भागांतील कवितांच्या प्रभावाने ताम्बे यांना विद्यमान कवींत पहिलें स्थान सहज मिळालें. १९३२ च्या डिसेम्बर मासीं कोल्हापूर येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य सम्मेलनांत ताम्बे कविसम्मेलनाचे अध्यक्ष झाले, आणि ता. २७ नोवेम्बर १९३४ या दिवशीं जेव्हा त्यांच्या वयाला साठ वर्षे पुरीं झालीं तेव्हा नगरोनगरीं त्यांचा जयजयकार झाला !

ताम्बे यांच्या कवितांचे दोन संग्रह प्रकाशित आहेत; आणि कांही नवीन कविता निरनिराळ्या मासिकांतून प्रकाशित झाल्या आहेत. या साऱ्या कवितांची मी एक हस्तलिखित प्रत सिद्ध केली. नंतर कै० कवि श्रीनिवास रामचन्द्र बोबडे यांच्याकडील ताम्बे यांच्या कवितांची वही मिळाली. " आठवती ते दिन अजुनी " आणि " ललने, चल चलुं लावलाही " या कविता बोबड्यांच्या वहीवरून घेतल्या आहेत. प्रो. मायदेव यांना ताम्ब्यांनी वेळोवेळीं आपल्या कवितांच्या ज्या प्रती पाठविल्या होत्या त्या त्या पत्र-व्यवहारासङ्गेच पहायला मिळाल्या; आणि वर, भास्कररावजींच्याकडे एक दोन ज्या जुन्या फाटक्या वह्या आहेत त्याहि मीं पाहून टाकिल्या. " रे हिन्या माझिया झळक घरीं " ही कविता दोन्ही ठिकाणीं आढळली. ती या सङ्ग्रहांत प्रथमच प्रकाशित करण्यांत येत आहे. याव्यतिरिक्त अन्य साधनसामग्री उपलब्ध झाली नाही. पण सर्व उपलब्ध हस्तलिखितें पाहून माझ्या हस्तलिखितांवर पाठभेदांची नोन्द मीं करून घेतली.

एखाद्या कवीची कविता त्याच्या जिवन्तपणीं दुसऱ्याने सम्पादून प्रकाशित करण्याचें कार्य वाटतें तितकें सुकर नाहीं. दिवंगत कवीच्या कविता सम्पादून प्रसिद्ध झाल्या तर हस्तलिखितांचा शोध करून, ती ताडून पाहून, विश्वसनीयतेच्या दृष्टीने त्यांचा क्रम लावून, मूळ निश्चित करून पाठभेद दिले की मुख्य कार्य संपतें. हें काम बिकट आणि किच्चकट असलें तरी सम्पादकाला तें करितांना एक प्रकारचें स्वातन्त्र्य असतें. व्यक्तिशः त्यांचा आणि

कवीचा सम्बन्ध येऊन घर्षण होण्याची भीति मुळींच नसते. कल्पना लढवून त्यांतल्या त्यांत जो अर्थ लागू पडेल तो बसवितां येतो. सम्पादकाचें कार्य किती बिनचूक झालें आहे आणि त्याने लाविलेला अर्थ योग्य आहे की नाही इत्यादि गोष्टींची परीक्षा लोक कितीहि कठोरपणाने करोत, कवि स्वतः मत द्यायला येण्याचा संभव नसतो. परन्तु सम्पादकाला कोणतीहि सुधारणा सुचविण्याचा अधिकार असला तरी कवि दिवङ्गत असल्यामुळे त्याला ती सुधारणा कृतींत आणण्याची सन्धि मिळूं शकत नाही.

विद्यमान, सुप्रसिद्ध पण प्रकाशनाविषयी उदासीन अशा कवीची कविता दुसऱ्याने सम्पादून प्रकाशित करण्याचें काम हें वर साङ्गितलेल्या कामाइतकेंच बिकट असतें, आणि वर अतिशय हळवें असतें. उपलब्ध हस्तलिखितें नि मुद्रितें पाहून मूळ निश्चित केल्यानन्तरहि त्याला कवीची मान्यता घ्यावी लागते; परन्तु पाठशुद्धीला नि अर्थनिश्चयाला कवीचेंच साह्य मिळण्याचा सम्भव असतो. कवीचेंच असें साह्य मिळण्याचा सम्भव दिसतांच अल्पायासाने दूर होऊं शकणारे बहिरंगाचे दोष तरी दूर करून घ्यावेत अशी इच्छा होते. कोठे छन्दोभङ्ग झालेले असतात तर कोठे मात्रा न्यूनाधिक झालेल्या असतात. कोठे कडवीं समचरणक दिसत नाहीत. चरण लिहिलेले असून गळून गेलेले असण्याचा संभव असतो तर ते मुळी रचलेलेच नसण्याचाहि संभव असतो. कोठे कडव्यांचा क्रम योग्य आणि परिणामकारक वाटत नाही; तर कोठे पुनरुक्तीचा दोष टळावा वा सङ्क्षेपाने उत्कटता वाढावी म्हणून एखादें कडवें गाळून टाकण्यासारखें असतें. कोठे व्याकरणदोष राहून जातो तर कोठे वर्णनांत मध्येच थोडी विसङ्गति वा अस्वाभाविकता आढळते. कोठे कविता समजत नाही तर कोठे कवीचा अभिप्रेत अर्थ असतो एक आणि वाचक करतात दुसराच असेंहि होतें. आणि कवि हा इतका उदासीन असतो की त्याची कविता आहे तशीच कोणी छापून काढिली तर तो यत्किञ्चित् चिन्ता करीत नाही. परन्तु कविकीर्तीच्या दृष्टीने सम्पादकाला तसें करणें इष्ट वाटत नाही. तीं शङ्कास्थळें कवीच्या दृष्टीस आणून कवीकडूनच तेथे शक्य ती सुधारणा करून घेण्याचें बिकट आणि हळवें काम हें सम्पादकाला कर्तव्यच वाटतें. सुधारणा करायची म्हटली म्हणजे दोष दाखविण्याचें अप्रिय काम

केल्याविना गत्यन्तर नसतें; आणि सुधारणा ही कवीला बहुशः सुचत असली तरी क्वचित् प्रसंगीं सुचवावीहि लागते. कवीची उदासीनता वा सहनशीलता ही मर्यादितच असायची; त्याचें आपल्या कृतीविषयींचें ममत्व केव्हा प्रकटेल याचा नेम नसतो. आणि पुन्हा कवीची सहनशील सहकारिता मिळाली तरी जी प्रगति होऊं शकते तिने सम्पादकाचें समाधान होतेंच असें नाही.

तथापि, या दिशेने प्रयत्न करून पहायचाच असा मीं निश्चय केला; कारण नुसतें सङ्कलनमुद्रण काय कोणींहि केलें असतें. मीं आधी शङ्कास्थलें दाखवून देणारें एक सविस्तर पत्र ताम्बे यांस लिहून त्यांत माझी अपेक्षा स्पष्ट मांडली. “ यांत काय विचारतां हो आणि अनुमति कसली मागतां ? माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे.” अशा आशयाचें अत्यन्त अनुकूल उत्तर ताम्बे यांच्याकडून आलें. तरी नुसत्या विश्वासाने आणि पत्रव्यवहाराने किती काम होणार ? कांही गोष्टींच्या निर्णयासाठी सम्भाषणाची, विचारविनिमयाची अत्यन्त आवश्यकता आहे असें पाहून मी ग्वाल्हेरास गेलों. तेथे ताम्बे यांना हस्तलिखित वाचून दाखवून शङ्कास्थलांची पूर्ण चर्चा करून प्रत्येक गोष्टीचा निर्णय मीं ताम्बे यांच्याकडूनच करवून घेतला. हें कार्य तडीस नेण्यास त्यांनी अभिजात लीनतेने आणि सहनशील सहकारितेने जें साह्य केलें त्याचे आभार मी कसे म्हणून मानावेत ? असो. त्यांच्या त्या वेळच्या सम्मतीवरहि न थाम्बतां या ग्रन्थाचीं कच्चीं मुद्रितें हींहि त्यांच्या दृष्टीखाली घालवून आणविलीं. त्यांच्या मुद्रणाचें कार्य चालू असतांना नव्या नव्या शङ्का सुचत त्या त्या स्थळीं पत्रव्यवहार करून ताम्बे यांचें मत मीं घेतलें. कित्येकदा कच्च्या मुद्रितांवर त्यांनी शुद्धि केली तेथे तेथे ती करून घेण्यांत आली. चर्चा होऊन जो पाठ त्यांनीच निश्चित केला तो फिरवून पुन्हा पहिला पाठ ठेवा असें त्यांच्याकडूनच लिहून आलें तेव्हा तेव्हा कच्च्या मुद्रितावर पुन्हा जुना पाठ घातला. तेव्हा आता हा छापील ग्रन्थ अधिकृत आणि विश्वसनीय आहे असें निःशङ्कपणें समजावें. तसा तो आहे म्हणूनच पाठभेद देण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

पहिल्या भागांतील ‘ सायङ्काळ ’ ही कविता, दोन्ही भागांत न आलेली परन्तु ‘काव्यरत्नावलि’ मासिकाच्या जुन्या अङ्कांतून शोधून काढून प्रो० भवानी-

शङ्कर पण्डित यांनी पुनः प्रकाशित केलेली ‘ जाईचीं फुलें ’ ही कविता आणि इतर कांही किरकोळ नि प्रासंगिक कविता यांचें हस्तलिखित सिद्ध असूनहि त्या या ग्रन्थांतून ताम्बे यांच्या साङ्गण्यावरून गाळल्या आहेत. कवितेची उत्कटता वाढावी म्हणून तीन-चार कवितांतून ताम्बे यांनी कांही चरण गाळून टाकिले आहेत; उलटपक्षीं छापील प्रतींतून गळालेले कांही चरण त्यांना स्थळें दाखवितांच आठवले ते या सङ्ग्रहांत घालण्यांत आले आहेत.

कवितांचे मथळे निश्चित करतांनाहि मी क्वचितच अधिकार गाजविला असेल. ताम्बे आपल्या कवितांना मथळे बहुशः देत नाहीत. वाचलेली कविता नांव ऐकतांक्षणीं ध्यानांत यावी असा तिला सूचक मथळा पाहिजे. असा आखूड सुटसुटीत मथळा जेथे सुचेना तेथे प्रथमचरणांतील वा ध्रुवपदांतील आरम्भींचा आवश्यक तेवढा भाग मथळा म्हणून दिला आहे.

पहिली आणि शेवटली कविता वगळल्यास उर्वरित कविता रचना-कालाच्या अनुक्रमाने दिल्या आहेत. निरनिराळीं हस्तलिखितें आणि पत्रव्यवहार ताडून पाहून ज्या तारखांच्याविषयी शङ्का राहिली नाही त्या तर दिल्याच आहेत; परन्तु नेमका काल जेथे सापडत नाही तेथे कविता अमुक कवितेच्या आधी लिहिली का तमुक कवितेच्या नन्तर लिहिली असे शोधक प्रश्न ताम्बे यांना विचारून लेखनकाल शक्य तितका जवळ जवळ निश्चित केला आहे. तथापि, त्यांत चूक असण्याचा संभव आहे; आणि हें दाखविण्या-करिता त्या कालापुढे प्रश्नचिन्ह घातलें आहे. कवितेचें संस्करण असें ताम्बे क्वचितच करितात. आणि जरी ही आवृत्ति सिद्ध करतांना ‘ कळा ज्या लागल्या जीवा ’, ‘ त्या दारावरुनी कोण निघे ? ’, ‘ किति महामूर्ख तूं शहाजहां ’ इत्यादि चारपाच कवितांत मागाहून फेरफार करण्यांत आले असले तरी त्या कवितांच्या अन्तरङ्गांत कांही अन्तर पडलेलें नाही. तेव्हा कवितांचा कालानुक्रमें अभ्यास केल्यास कवीच्या मनावर कोणत्या वेळीं कोणकोणत्या विषयांची पकड होती हेंहि कळेल आणि भाषाशैलींत कांही सङ्क्रमण झालें असल्यास तेंहि समजेल. ताम्बे यांच्या कवितांचा अभ्यास करितांना कालानुक्रमाला महत्त्व आहे, कारण ताम्बे यांच्या या भावकविता म्हणजे जीवनलहरी आहेत.

आपल्या एका पत्रांत ताम्बे म्हणतात,[१] " माझ्या कवितेचा हा एक विशेष आहे की, तिची वाढ माझ्या जीवनाच्या सङ्गतीने झाली आहे. मी पन्धरा वर्षांचा होईपर्यन्त ती शिशूप्रमाणे बोवडे बोल बोले. माझ्या नवयौवनाच्या काळांत ती कामुक झाली; आणि खरोखर त्या वेळच्या कांही कविता मी जाळून टाकिल्या. विवाहानंतर ती एक प्रेमांतच गुङ्गून गेली. पुढे माझीं मुलें सभोवती दिसूं लागतांच तिने मुलांचीं गाणीं गायिलीं. मृत्यु जेव्हा माझ्या दाराशीं आला आणि मुलांना घेऊन गेला तेव्हा ती कविता चिन्ताक्रान्त आणि उदासवाणी झाली. ' मध्यरात्रिच्या निवान्त समयीं रे माझ्या हृदया ', ' पोरकीं बाळें ' आणि इतर कांही कविता या तेव्हा स्फुरल्या. जीवितांतील वस्तुस्थितीची आणि माझ्या मनाची सङ्गति जुळल्यावर पुन्हा एकदा प्रेम-कवितेचें पीक आलें. या कवितांचा सूर अधिक गम्भीर आणि यांचें स्वरूप अधिक व्यापक आहे..... आता, फुललेल्या गुलाबाच्या पाकळ्या गळून पडाव्यात तसे माझ्या भोवतीचे साहित्यिक गळून पडल्यावर; अशक्तता, क्लेश आणि रोग हीं माझ्या शरीरांत ठाणें देऊन बसल्यावर आणि झन्झा-वाताच्या झपाट्यांत गावलेल्या होडग्याप्रमाणे माझा संसार इतस्ततः फेकला गेल्यावर, माझे डोळे जर इहलोकच्या सीमेपलीकडील दूरस्थ प्रदेशाकडे, त्या परम भवितव्याकडे लागले तर त्यांत आश्चर्यकारक असें काय आहे ? दिक्कालांच्या सीमांच्या पलीकडे दूर दूर असलेल्या त्या रम्याद्भुत मोहन-लोकांतील घण्टांचा क्वणत्कार मला आता ऐकूं येत आहे......"

[" ...... It is a remarkable feature of my poetry, it has grown with my life. It babbled like a child when I was below fifteen. It was licenscious in my early youth and I actually burned some of those pieces. It dwelt upon love after wedding till children sprang up

---

[१] प्रो० मायदेव यांना ग्वाल्हेराहून ता. २४ एप्रिल १९३३ ला लिहिलेलें पत्र. इंग्रजी पत्राच्या इतरत्र दिलेल्या भाषान्तराप्रमाणे हेंहि भाषान्तर माझें आहे.

आता डावलून जातां येणार नाही. ताम्बे यांचे मामेभाऊ विसूभाऊ डोंगरे यांनी टागोरांचा ' The Gardener ' हा कवितासंग्रह आणि ताम्बे यांची कविता यांतील कांही साम्यस्थळें प्रतिभा मासिकांतून दाखविल्यापासून ताम्बे यांचे कांही भक्त गडबडले आहेत. परन्तु स्वत: ताम्बे गडबडले नाहीत; आणि खरोखरच गडबडून जाण्याचें कांहीच कारण नाही. तीं साम्यस्थळें पाहतां एवढेंच दिसतें की, ताम्बे तत्सदृश मन:स्थितींत असतांना ' दी गार्डनर ' हें पुस्तक ताम्बे यांच्या हातीं पडलें, आणि तें त्यांनी अत्यन्त समरसून वाचिलें. मनुष्य जेव्हा वाचन करितो तेव्हा कांही शब्दप्रयोग, कांही वर्णिलेलीं दृश्यें, कांही निरन्वय कल्पना हीं मनांत खोल ठसतात, अगदी अज्ञात मनांत जाऊन बसतात; आणि लेखनाच्या वेळीं न कळत वर उसळून नवनिर्मित सृष्टींत अकल्पित स्थानें पटकावतात.

हा प्रकार अत्यन्त प्रतिभाशाली लेखकांच्या लिखाणांतहि घडतो. अनुभविलेल्या गोष्टीहि अशा रीतीने वाङ्मयांत उमटतात पण त्या उमगत नाहीत. परन्तु वाचलेल्या गोष्टी शाब्दिक साम्यामुळे उमगतात; तथापि तेवढ्याने कृतीची स्वतन्त्रता, निर्मितीची नवीनता ही नष्ट होत नाही, हीं साम्यस्थळें शाब्दिकच असतात; त्यांच्या मुळाशीं सहेतुक योजना दिसत नाही. रूपान्तरांत प्रज्ञेची जाणतेपणीं होणारी क्रिया असते; परंतु पृथगात्म स्वतंत्र कृति ही प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनुभूतींपासूनच होत असली तरी प्रतिभेच्या गूढ, न कळत होणाऱ्या संयोजनेने होते. एका कवितेंतील कांही शब्द वा कल्पना हीं भलत्याच कवितेंत अगदी एकजीवपणे मिळून गेलेलीं दिसतात याचें कारण प्रतिभेची गूढ संयोजना हेंच होय. एखादी वाङ्मयकृति पूर्वीच्या वाङ्मयकृतीसारखी आहे अशी शङ्का आल्यास दोन्ही कृति एकामागून एक वाचून पहाव्यात; आणि मग जर पाठीमागील कृति प्रभावी आणि पृथगात्म वाटली तर ती स्वतंत्र आहे असें म्हणायला कांही प्रत्यवाय नसावा. शेक्सपिअर–फिज्जेरल्डसारखे कवि धडधडीत दुसऱ्याची कृति रूपान्तरायला घेतात; पण प्रतिभेचा प्रभावच असा असतो की, दिसायला साम्य दिसूनहि वस्तुतः कांही नवीनच निर्माण होतें. पितळ असतें त्याचें सोनें होतें; जड असतें तें सचेतन होतें. प्रतिभेचा परीस हा असा आहे. तेव्हा या दिसणाऱ्या शब्दसाम्यांना भिण्याचें कारण नाही. ' चल जळो ज्ञानविज्ञान गड्या ' आणि ' राजराजेश्वरा हो दयाळा ' या दोनच ताम्बे

यांच्या कविता रूपान्तरित वाटतात. तेथेहि, कांही तरी लिहिलेंच पाहिजे आणि स्वतन्त्र स्फूर्ति तर होत नाही; तेव्हा अमुक एक कवितेचें सोयीचें असें रूपान्तर करून कार्यभाग साधावा असा विचार ताम्बे यांच्या मनांत आला नसेल.

पुन्हा शाब्दिक साम्याच्या बळावर अमुक एक गोष्ट तमुक एका गोष्टी-वरून घेतली, असें म्हणण्यांत चूक होण्याचा सम्भव असतो. ताम्बे यांनी 'दी गार्डनर' हा कवितासङ्ग्रह वाचला होता एवढ्यावरूनच जर कोणी म्हणेल की,

"I try to weave a wreath all the morning, but the flowers slip and they drop out. You sit there watching me in secret through the corner of your prying eyes. Ask those eyes, darkly planning mischief, whose fault it was." (G 39)

या कवितेचें, "डोळे हे जुलमि गडे" हें रूपान्तर आहे तर तो चाङ्गलाच फसेल; कारण दी गार्डनर प्रथम प्रसिद्ध झालें १९१३ मध्ये आणि ताम्बे यांची कविता १८९१ च्या सुमारास झालेली, म्हणजे रवीन्द्रनाथ प्रसिद्धिच पावले नव्हते तेव्हाची आहे. तेव्हा साम्यस्थळें गावतील तितकीं द्यावींत; पण मत पूर्ण विचारान्तींच ठरविलें पाहिजे.

कविसम्मेलनाचे जे दोनदा अध्यक्ष झाले त्यांच्या कवितेचा परिचय करून देण्याची आवश्यकता आता तादृश राहिली नाही. त्यांच्यापेक्षा वीस वर्षांनी लहान अशा माझ्यासारख्याने तो परिचय करून देण्याचा आव आणून पहिल्या भागाचे प्रस्तावनालेखक वासुदेव बळवन्त पटवर्धन आणि दुसऱ्या भागाचे प्रस्तावनालेखक रावमहाशय नरसिंह चिन्तामण केळकर यांच्या पङ्क्तीस बसण्याचा मान घ्यावा हें अनुचित होईल. बरें, ताम्बे यांच्या समग्र कवितेचें समीक्षण करूं म्हटलें तर प्रस्तावना हें समीक्षणाचें स्थळ नव्हे. त्यांतून ताम्बे यांच्या कवितांची चर्चा ज्या निबन्धांतून आली आहे अशा निबन्धांचा एक उपयुक्त सङ्ग्रह ग्वाल्हेर येथील, ताम्बेवाढदिवसमण्डळाने प्रकाशित केला आहे. जिज्ञासूंच्यासाठी त्या ग्रन्थाकडे अङ्गुलिनिर्देश केला की

माझें सम्पादकीय कर्तव्य सम्पलें. ताम्बे यांच्यासारख्या प्रभावी पण प्रसिद्धि-पराङ्मुख अशा कवीच्या कवितांचा एक अधिकृत विश्वसनीय सङ्ग्रह नीट सम्पादून रसिक अभ्यासकांना उपलब्ध करून द्यावा या एकाच हेतूने मीं हें कार्य हातीं घेतलें. कार्य करण्याचा म्हणून जो आनंद असतो तो मीं अनुभविलाच. आता कवीच्या एकसष्टाव्या वाढदिवशीं हा ग्रंथ रसिक वाचकांच्या सेवेशीं प्रविष्ट केल्यावर कवीस सन्तोष झाला आणि वाचकांचें समाधान झालें की माझ्या श्रमांचें सार्थक झालें. खरोखर परिश्रमाव्यतिरिक्त माझें असें या ग्रन्थांत काय आहे ?

" फोडिलें भाण्डार,
धन्याचा हा माल,
मी तंव हमाल
भारवाही "—

डेक्कन जिमखाना, पुणें ४
ता. ८ नोव्हेम्बर १९३५

**माधवराव पटवर्धन**

मर्मज्ञ व तत्त्वज्ञानी यांचेहि ग्रंथ वाचण्याची त्यांना संधि मिळाली. वरील मैत्रीचा, चर्चेचा व वाचनाचा तांबे यांस चांगला फायदा झाला आणि त्याचा त्यांनी नीट उपयोग करून घेतला असें म्हटलें तर वावगें होणार नाही कारण याच १९०२–०३ च्या काळांत त्यांनी निरनिराळे लेखनप्रयोग करून आपली काव्यशक्ति व कल्पनाशक्ति कसास लावून पाहिली. केवळ १९०२ च्या मेपासून १९०३ च्या ऑगस्टपर्यंत त्यांच्या ४० कविता आहेत.

भास्कररावांच्या काव्यवल्लीच्या या पहिल्या बहराकडे नजर टाकल्यास त्यांचे कवितांवर संस्कृत वातावरणाची बरीच छाया होती असें म्हटलें तर चूक होणार नाही. शब्द-योजना, वृत्तें, संकेत, शैली या सर्व बाबतींत त्यांचेकडून भवभूति, जगन्नाथ व जयदेव वगैरेंचें अनुकरण न कळत होत असे. परंतु याच काळांत इंग्रजी भाषेंतील अद्भुतरम्य, मोकळें व स्वातंत्र्याचें वारें त्यांना मानवूं लागलें होतें याचें प्रत्यंतर येतें. स्कॉटच्या अद्भुतरम्य, कथात्मक व शाहिरी वाङ्मयावरून त्यांना रजपूत लोकांतील व मराठेशाहींतील मर्दपणा व शृंगार आठवला. त्याचीच सुंदर प्रचीति आपणास 'बिजली जशि चमके स्वारी', 'राजकन्या व दासी' आणि 'मुशाफिर आम्ही' या कवितांतून आढळते.

श्रीयुत भास्कररावांना १९०३ सालीं इंदूर येथेच सीनिअर देवासचे वकील म्हणून काम पहावें लागलें. संस्थानी वातावरणाचा हीनसपणा त्यांचे ध्यानीं तर सारखाच होता. परंतु पोटाकडे लक्ष देऊन त्याविरुद्ध बोलण्याची सोय नव्हती. अशा परिस्थितींत शुद्ध, मोकळ्या, स्वतंत्र वातावरणांत राहण्याची त्यांचे मनांत किती उत्सुकता होती याची कल्पना आपणास या वेळच्या त्यांच्या 'प्रीतीचा वास' या कवितेवरून येते. १९०४ मध्यें ते आजारी पडून पचमढीस गेले होते. तेथील रम्य वनश्रीने मराठी वाङ्मयाला एका सुंदर कवितेची देणगी मिळवून दिली. 'सखये या स्थानीं वसावें वाटे दिनरजनी' ही कविता थोडी लांब झाली आहे हें खरें, परंतु भास्कररावांच्या आशा, आवडी व आकांक्षा कोणत्या होत्या आणि त्यांच्या मनाची बैठक प्रथमपासूनच कशी प्रेमळ, शुचि व धैर्य-पूर्ण होती याची सुंदर कल्पना हें गीत वाचलें असतां तेव्हाच येते.

१९०२ ते १९०८ या सालांत त्यांनी कित्येक इंग्रजी कवि अभ्यासिले होते. त्यांचीं Sonnets त्यांनी वाचलीं होतीं. सुनीतांबद्दल महाराष्ट्रांत

केशवसुत प्रयोग करून पहात होते. सुनीताची अपूर्वता भास्कररावांचे लक्षांत येतांच त्यांनीही प्रथम कांही श्लोकवजा कवनें लिहिलीं व नंतर सुनीताची रचना करून पाहिली. त्यांच्या सर्व सुनीतांत ' गेली ज्योति विझोनिया ' हें सुनीत लिहून त्यांनी असामान्य यश मिळविलें. असें म्हणण्याचें कारण हें की, केशवसुतांसारख्या कवीने हें सुनीत पाहून मान डोलविली.

या काळांतली त्यांची ' ललने चलुं चञ्च लवलाही ' या नांवाची एक कविता आहे. संस्कृतांतील संकेत घेऊन त्यांवर आधारलेलें हें पदलालित्यपूर्ण प्रेमगीत कुणालाही आवडेल असें आहे.

१९०७ सालीं भास्करराव जळगांवीं कविसंमेलनास हजर राहिले होते. त्या वेळीं महाजनी, टिळक, चंद्रशेखर, विनायक व टोमरे ही मंडळी त्यांस भेटली. त्याच संमेलनांत टोमरे यांचा बालकवि म्हणून सन्मान झाला. त्या वेळीं कांही बालगीतें ऐकून की स्वतंत्रपणें कुणाला ठाऊक, भास्कररावांनी ' तर मग गट्टी कोणाशीं', 'आईकडे न्या', 'शिशुवंचन' वगैरे कविता लिहिल्या. त्यांतील ' तर मग गट्टी कोणाशीं ' हें कवन प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धनांना इतकें आवडलें होतें की, अशा तऱ्हेचीं शिशुगीतेंच भास्करराव लिहिते तरी त्यांचें मराठी कवींतील स्थान अढळ झालें असतें असे उद्गार त्यांनी काढले.

१९०८ सालीं भास्कररावांची इंदूर येथील नोकरी सुटली व त्यांना १९०९ त गुदरखेडा येथें नोकरी मिळाली. हें ठिकाण इंदूरपासून जवळच असल्यामुळे साहित्यप्रेमी मंडळींची त्यांचेकडे ये जा चालू असे. गुदरखेड्यास असतांना एका युरोपियन अधिकाऱ्याने आपली एक प्रेमकहाणी भास्कररावांना सांगितली. ती ऐकून भास्कररावांचे मनाला चटका लागला व ब्राउनिंगचे वाचनाने एकोक्तीसारख्या रचनेला हा प्रसंग उत्तम आहे असें ध्यानांत येऊन त्यांनी ' तूं हुबेहूब साउली त्याच मूर्तिची ' हें सुंदर नाट्यगीत लिहिलें.

१९१० त भास्कररावांची आनंदकर्ते आपटे व लोकशिक्षणकार जांभेकर यांची ओळख झाली. येथपावेतों भास्करराव निरनिराळ्या प्रकारचें लेखन करून पहात होते. त्यांनी शिशुगीतें, एकोक्ति, द्वंद्वगीतें, सुनीतें व इतर प्रकारचीं भावगीतेंही लिहून पाहिलीं, परंतु त्यांचें त्यांनाच त्यांत अपूर्व यश आलें आहे असें वाटत नव्हतें.

